RNI NO. MAHMAR/2020/84035

कायदेविषयक मार्गदर्शन मोफत
संपर्क
ॲड. सिद्धार्थ
MVsc, MBA, LLM
मो नं ९४२२५३९४५१

BAHUJAN SAURABHA

# बहुजन सौरभ

**दि. २३ ऑगस्ट २०२६**



१९४२- दलित वर्ग हितकारिणी मंडळा तर्फे मजूर मंत्री डॉ बाबासाहेब आंबेडकरांचा दिल्ली येथे सत्कार.
१९४५- कलकत्ता येथे दामोदर व्हॅली योजणेवर बाबासाहेबांचे भाषण.

संकलन प्रा. यशवंत दुपटे

रविवार २३ ऑगस्ट २०२६ | वर्ष : ६ | अंक : २३३ | दैनिक | किंमत : ₹ ५/-
Sunday, 23 August 2026 | Year : 6 | Issue : 233 | Daily | Rate: Rs. 5/-

# उपवर्गीकरणाविरुद्ध एल्गार



## नाशिकमध्ये एल्गार महामोर्चा यशस्वी : हजारो आंबेडकरी बांधवांनी रस्त्यांवर उतरून उपवर्गीकरणाला ठणकावले




**नाशिक :** आरक्षण उपवर्गीकरण विरोधी संघर्ष समिती, नाशिक जिल्हा यांच्या वतीने आयोजित 'एल्गार महामोर्चा' आज शनिवारी नाशिक शहरात मोठ्या उत्साहात आणि प्रचंड जनसहभागाने यशस्वीरीत्या पार पडला.

सकाळी ईदगाह मैदान (गोल्फ क्लब मैदान) येथून सुरू झालेला महामोर्चा डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्यापर्यंत पोहोचला. संपूर्ण मार्गावर निळ्या झेंड्यांची आणि निळ्या टोप्यांची लाट उसळली होती. पुरुष-स्त्रिया, युवक-युवती, वृद्ध सर्वजण मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. रस्ते निळ्या रंगाच्या झेंड्यांनी आणि आंबेडकरांच्या फोटोंनी नटले होते.

महामोर्च्याचे मुख्य वैशिष्ट्य

**प्रचंड गर्दी :** मोर्चा इतका मोठा होता की संपूर्ण मार्ग गर्दीने व्यापला गेला. दुकानं बंद होती आणि रस्त्यांवर केवळ आंबेडकरी बांधव दिसत होते.

**५९ जातींचे एकत्रीकरण :** मोर्चाला ५९ जातीसमूहांचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते. "५९ जातींना सोबत घेऊन आंबेडकरी समाजाचा एल्गार" ही घोषणा सर्वत्र गुंजत होती.

समाजरक्षक अर्जुन पगारे यांच्या प्रमुख नेतृत्वाखाली मोर्चा निघाला. प्रकाश पगारे, अनिल वैद्य, डॉ प्रवीण गांगुर्डे, सनिभाई रोकडे तसेच इतर आंबेडकरी नेते मंचावर उपस्थित होते.

"संविधान वाचवा! आरक्षण वाचवा!!", "आरक्षण उपवर्गीकरण रद्द करा", "जय भीम! जय संविधान!" या घोषणा गर्दीत जोरदार दिल्या जात होत्या. प्रसतिनिधी मंडळाने जिल्हाधिकारी यांना निवेदन दिले, प्रशासन, पोलीस विभागाने मोर्चासाठी सर्व सहकार्य केले..

डॉ बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याजवळ राष्ट्रगीताने मोर्चा समाप्त करण्यात आला.

**मंचावरून काय म्हटले?**

मंचावरून बोलताना नेत्यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, "आरक्षण हा हक्क आहे, उपकार नाही. उपवर्गीकरणाच्या नावाखाली आंबेडकरी समाजात फूट पाडण्याचा प्रयत्न चालला आहे. आम्ही याला कधीच मान्य करणार नाही. हा एल्गार केवळ नाशिकपुरता मर्यादित नाही, तर संपूर्ण महाराष्ट्राचा आवाज आहे." मोर्च्यात सहभागी झालेल्या बांधवांनी सांगितले की, "आज आम्ही एकत्र आलो आहोत. बाबासाहेबांच्या विचारांसाठी आणि आरक्षणाच्या रक्षणासाठी आम्ही तयार आहोत. सरकारने आमचा आवाज ऐकावा."

मोर्चा शांततापूर्ण पद्धतीने पार पडला. कोठेही कोणताही प्रकारचा गोंधळ झाला नाही. पोलिस यंत्रणाही सतर्क होती.

## राहुल गांधींच्या कार्यक्रमापूर्वी पुण्यात एबीव्हीपी-एनएसयूआयमध्ये संघर्ष



**पुणे :** पुण्यात राहुल गांधींच्या 'सिंगिंग द स्टुडंट्स' कार्यक्रमाच्या पार्श्वभूमीवर राजकीय तणाव वाढला आहे. काँग्रेस नेते पवन खेरा यांनी हा कार्यक्रम उधळून लावण्याचा कट रचल्याचा आरोप केला आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरद पवार) नेते रोहित पवार यांनीही भाजपवर हा कार्यक्रम उधळून लावण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप केला आहे.

लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी शनिवारी संध्याकाळी 'छत्रों की गुंज' कार्यक्रमात विद्यार्थिनींशी संवाद साधणार आहेत. या कार्यक्रमाच्या आधी, शुक्रवारी सीओईपी टेक्नॉलॉजिकल युनिव्हर्सिटीच्या वसतिगृह परिसरात एबीव्हीपी आणि एनएसयूआयच्या कार्यकर्त्यांमध्ये संघर्ष झाला. यानंतर, पोलिसांनी शनिवारी ५० ते ६० युवक काँग्रेस कार्यकर्त्यांविरुद्ध गुन्हा दाखल केला. पवन खेरा म्हणाले की, केवळ पुणे आणि महाराष्ट्रातच नव्हे, तर देशभरातील तरुणांमध्ये सत्ताधाऱ्यांविरुद्ध संताप आहे. ते म्हणाले की, इतिहास दाखवून देतो की जेव्हा तरुण संतप्त होतात, तेव्हा ते बदल घडवून आणतात. खेरा यांच्या मते, तरुणांच्या संतापाचा आवाज पुण्यातही स्पष्टपणे ऐकू येत आहे. खेरा यांनी आरोप केला की, कार्यक्रमाला मिळालेल्या प्रतिसादाने राज्य सरकार घाबरले आहे. त्यांनी दावा केला की, जेव्हा एखादी तरुणी आवाज उठवते, तेव्हा तिला लक्ष्य केले जाते. तिच्या कपड्यांवर आणि चारित्र्यावर टीका केली जाते.

त्यांनी एबीव्हीपीच्या कार्यकर्त्यांवर मुलींच्या वसतिगृहात घुसून विद्यार्थिनींना धमकावल्याचा आरोप केला. खेडा यांनी दावा केला की, काही विद्यार्थिनींना माफीचे व्हिडिओ रेकॉर्ड करण्यास भाग पाडले गेले. त्यांनी असेही सांगितले की, काही विद्यार्थिनींना शिष्यवृत्ती निधीचा मुद्दा राहुल गांधींसमोर मांडायचा होता.

या संघर्षासंदर्भात, एबीव्हीपीने आरोप केला की काँग्रेस कार्यकर्ते 'स्कूल्स इको' कार्यक्रमासाठी नोंदणी करण्याकरिता सीओईपीच्या विद्यार्थ्यांवर दबाव आणत होते. दरम्यान, काँग्रेस नेत्यांनी दावा केला की, कार्यक्रमाच्या समर्थनार्थ बोललेल्या दोन विद्यार्थ्यांना वसतिगृहात कोंडून धमक्या देण्यात आल्या. भाजपला राहुल गांधींची भीती वाटतेः रोहित पवार. भाजपला राहुल गांधींची भीती वाटत असल्याचे दिसते आणि म्हणूनच ते 'स्कूल्स इको' कार्यक्रमात अडथळा आणण्याचा प्रयत्न करत आहेत. त्यांनी आरोप केला की, ज्यांनी विद्यार्थ्यांना कथितरित्या कोंडून धमक्या दिल्या, ते मोकाट फिरत आहेत, तर दुसरीकडे एनएसयूआयच्या कार्यकर्त्यांवर त्यांना त्रास दिल्याबद्दल गुन्हे दाखल केले जात आहेत.

## १०-१२ दिवसांत साखरेचे दर १०० रुपयांवर जाणार : प्रकाश आंबेडकर



**छत्रपती संभाजीनगर :** येत्या १० ते १२ दिवसांत साखरेचे भाव प्रति किलो १०० रुपयांवर पोहोचतील, असा खळबळजनक दावा वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी केला आहे. सरकारच्या चुकीच्या धोरणांमुळे गणेशोत्सव, नवरात्र आणि दिवाळी हे सण गोड होण्याऐवजी कडू होणार असून, या दरवाढीविरोधात जनतेने रस्त्यावर उतरून लोकप्रतिनिधींच्या घरांसमोर धरणे आंदोलन केले पाहिजे, असे आवाहन त्यांनी केले. छत्रपती संभाजीनगर येथे आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी त्यांनी साखर दरवाढ आणि केंद्र सरकारवर टीका केली.

सरकारकडे कोणतेही ठोस नियोजन नसून फक्त नफा कमावणे हाच त्यांचा अजेंडा असल्याचा आरोप आंबेडकरांनी केला. मळी आणि रॉ शुगर इथेनॉल निर्मितीकडे वळवण्यात आल्यामुळे देशात साखरेचा तुटवडा निर्माण झाला आहे. भारताला आता दुप्पट किमतीने तब्बल १० मिलियन टन साखर आयात करावी लागण्याची परिस्थिती आहे.

शुगर माफियांनी साखरेचे भाव वाढवले असून ते आणखी वाढतील. मोदक आता गोड लागण्याऐवजी कडू लागतील, असा टोला त्यांनी लगावला. हे दर नियंत्रणात आणायचे असतील तर जनतेने आमदार, खासदार आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या लोकप्रतिनिधींच्या घरांसमोर तिरंगा घेऊन आंदोलन केले पाहिजे, असे ते म्हणाले.

यावेळी त्यांनी केंद्र सरकारवर टीका केली. ते म्हणाले, हे माफियांचे आणि हुकूमशाहीचे सरकार आहे. देशात लोकशाही संपली असून सत्ताधारी व पोलीस जनतेचे नोकर आहेत, हे त्यांनी विसरू नये.




## एनआयएकडून अनंतनागमधील 2 ठिकाणी छापे



**श्रीनगर :** एनआयए अर्थात राष्ट्रीय तपास यंत्रणेने शनिवारी 22 ऑगस्टला दहशतवादाशी संबंधित एका प्रकरणात जम्मू आणि काश्मीरमधील अनंतनाग जिल्ह्यातील अनेक ठिकाणी छापे टाकले. एनआयएने दक्षिण काश्मीरमधील बिजबेहरा आणि दूर या जिल्ह्यात छापे टाकले. एनआयएने जम्मू-काश्मीर पोलीस आणि केंद्रीय राखीव पोलीस दलासह ही कारवाई केली. तपासाचा भाग म्हणून गुलाम नबी हजाम आणि सुहेल गनी भट यांच्या घरांवर छापे टाकण्यात आले, अशी माहिती अधिकाऱ्यांनी दिली.

एनआयएच्या सुरु असलेल्या तपासाच्या अनुषंगाने ही कारवाई करण्यात आली. सूत्रांनुसार, दोन्ही ठिकाणी शोधमोहीम आणि इतर कायदेशीर कारवाई सुरू होती. मात्र एनआयएकडून या कारवाईदरम्यान कुणाला अटक करण्यात आली की नाही? तसंच काही आक्षेपार्ह साहित्य किंवा इतर वस्तू जप्त करण्यात आल्या की नाहीत? हे स्पष्ट झालेलं नाही. दोन्ही छाप्यांसंदर्भात अधिक तपशील आणि एनआयएच्या अधिकृत निवेदनाची प्रतीक्षा आहे.

## IAS ज्ञानेंद्र कुमार विमानतळावरूनच गायब



**बंगळुरु :** कर्नाटकमधून एक अत्यंत धक्कादायक बातमी समोर आली आहे. २०१६ च्या बॅचचे वरिष्ठ आयएएस अधिकारी ज्ञानेंद्र कुमार गंगवार गेल्या दोन दिवसांपासून बेपत्ता झाले असून प्रशासनाचा त्यांच्याशी कोणत्याही प्रकारचा संपर्क होऊ शकलेला नाही. या घटनेमुळे प्रशासनात आणि राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे.

गृहमंत्री प्रियंक खर्गे यांनी शनिवारी या घटनेची माहिती दिली. त्यांनी दिलेल्या माहितीनुसार, गंगवार यांच्याबाबतची प्राथमिक माहिती सरकारला मिळाली आहे. मात्र, अद्याप त्यांच्या कुटुंबाकडून किंवा इतर कोणाकडूनही पोलिसांत कोणतीही अधिकृत तक्रार दाखल करण्यात आलेली नाही.

सध्या उद्योग आणि वखार विभागात एमएसएमई संचालक म्हणून कार्यरत असलेले ज्ञानेंद्र गंगवार हे २० ऑगस्टपासून कोणाच्याही संपर्कात नाहीत. तपासादरम्यान त्यांचे शेवटचे लोकेशन बंगळुरुच्या केम्पेगौडा आंतरराष्ट्रीय विमानतळावर ट्रेस झाले. त्यांनी दिल्लीसाठी विमानाचे तिकीट बुक केले होते, अशी माहिती समोर आली.

गृहमंत्री खर्गे यांनी सांगितले की, त्यांच्याशी संपर्काचे सर्व मार्ग बंद झाले आहेत. विमानतळावरून काही तांत्रिक माहिती मिळाली असून पोलीस आणि प्रशासन या प्रकरणाचा अधिक तपास करत आहेत.

ज्ञानेंद्र गंगवार यांनी यापूर्वी कर्नाटक लोकसेवा आयोगामध्ये परीक्षा नियंत्रक म्हणून जबाबदारी सांभाळली होती. मार्च महिन्यात त्यांना या पदावरून हटवण्यात आले होते. त्यांच्या अचानक गायब होण्यामागे कर्नाटक लोकसेवा आयोगामधील घडामोडींचा संबंध असल्याचे बोलले जात आहे.

दरम्यान, कर्नाटक लोकसेवा आयोगामधील भरती प्रकरणातील कथित घोटाळ्याप्रकरणी ईडीने कारवाई केली. ईडीने आयोगाचे अध्यक्ष शिवशंकराप्पा एस. साहूकार, शांता होसमणी यांच्यासह अनेकांच्या ठिकाणांवर छापे टाकले. साहूकार यांच्यावर भ्रष्टाचाराचे गंभीर आरोप असून, त्यांनी बनावट उत्पन्न प्रमाणपत्राच्या आधारे स्वतःच्या मुलांना सरकारी नोकरी मिळवून दिल्याचा आरोप आहे.

## 'इंडिगो'ची वेबसाइट ठप्प

**नागपूर :** विमान प्रवासाच्या तयारीत असलेल्या हजारो प्रवाशांना देशातील प्रमुख विमान कंपनी इंडिगोच्या वेबसाइट आणि ऑनलाइन सेवांमध्ये तांत्रिक बिघाड झाल्याने मोठ्या अडचणींचा हजार सामना करावा लागला. गेल्या तीन दिवसांपासून सुरू असलेल्या या तांत्रिक समस्येमुळे नागपूरहून प्रवास करणाऱ्या सुमारे ९ प्रवाशांच्या तिकीट बुकिंगवर परिणाम झाल्याची माहिती आहे. मात्र, या विमान कंपनीने तांत्रिक समस्या काळात प्रवाशांसह ट्रॅव्हल एजन्सींनाही मोठ्या अडचणींचा सामना करावा लागला.

इंडिगोच्या कोअर रिझर्व्हेशन प्लॅटफॉर्ममध्ये वारंवार तांत्रिक बिघाड होत असल्याने तिकीट बुकिंग प्रक्रिया विस्कळीत झाली होती. त्याचबरोबर वेब चेक-इन आणि अन्य ऑनलाइन सेवांचा वापर करतानाही प्रवाशांना अडचणी येत होत्या. विमान कंपनीनेही तांत्रिक बिघाडाची पुष्टी केली आहे.

चला, मिळून उभारुया नालंदा अभियान कॅम्पस!
नालंदा अभियान कॅम्पस उभारणीत समाजाचा सहभाग: एक संवाद

दिनांक : रविवार, २३ ऑगस्ट २०२६ | वेळ : सायंकाळी ४:०० वाजता
स्थळ : सरोज मंगलम हॉल, सानेवाडी, वर्धा

नालंदा अकॅडमी, वर्धा गेल्या १३ वर्षांपासून वंचित व ग्रामीण विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी मोफत शिक्षण, मार्गदर्शन आणि संधी उपलब्ध करून देत आहे. आता वायफड, वर्धा येथे ९.१५ एकर परिसरात 'नालंदा अभियान कॅम्पस' साकारत असून, हे राष्ट्रीय स्तरावरील निवासी बौद्ध शैक्षणिक केंद्र म्हणून विकसित होईल.

कार्यक्रमाची प्रमुख आकर्षणे

नालंदाचा १३ वर्षांचा प्रवास आणि कॅम्पसचे सादरीकरण
नालंदाच्या १३ वर्षांच्या कार्याचा आढावा, कॅम्पसची सध्याची प्रगती आणि भावी दिशा यांविषयी विशेष सादरीकरण.

जाहीर सत्कार

स्मृतिशेष प्रा. अभियान हुमणे यांच्या स्मरणार्थ त्यांचे आई-वडील, **सौ. कांताताई हुमणे** व **श्री. शशिकांत हुमणे** यांनी नालंदा अभियान कॅम्पससाठी ₹१.२५ कोटींचे मोलाचे धम्मदान दिले आहे.


शब्द आणि सुरांची मैफल

सोनाली वानखेडे
सुप्रसिद्ध गायिका
ANNEX Musical Group
अनंत राऊत
सुप्रसिद्ध मराठी कवी


आपण सर्वांनी आवर्जून उपस्थित राहावे, ही सस्नेह विनंती.

आयोजक
रमाई फाऊंडेशन • स्वतंत्र समता शिक्षक संघ • संत गाडगेबाबा आपुलकी ग्रुप • डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समिती, सावंगी (मेघे)
अधिक माहितीसाठी : 9420246406 | 7028556406 | 7767990921

## पदवी मिळूनही तरुणांमध्ये रोजगाराभिमुख कौशल्यांचा प्रचंड अभाव



**नवी दिल्ली :** देशात दरवर्षी पदवीधरांची संख्या विक्रमी वेगाने वाढत असली, तरी प्रत्यक्षात शिकलेल्या विषयानुरूप नोकरी मिळणाऱ्या तरुणांचे प्रमाण अवघे ८.२५ टक्के असल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले आहे. निती आयोगाने नुकत्याच प्रसिद्ध केलेल्या 'रीइमॅजिनिंग स्किलिंग फॉर विकसित भारत @२०४७' या अहवालात ही आकडेवारी मांडण्यात आली असून, देशातील बेरोजगारीपेक्षाही 'शिक्षण आणि उद्योगजगताची गरज' यातील तफावत अत्यंत गंभीर वळणावर पोहोचल्याचे स्पष्ट झाले आहे.

केंद्रीय अर्थसंकल्पीय आर्थिक पाहणी अहवाल २०२४-२५ चा संदर्भ देत निती आयोगाने म्हटले आहे की, उच्च आणि तांत्रिक शिक्षण प्रणालीमध्ये शिकवले जाणारे विषय आणि बाजारातील प्रत्यक्ष मागणी यात ताळमेळ राहिलेला नाही. अनेक संस्थांमधील अभ्यासक्रम कालबाह्य झाले असून पदवी किंवा प्रमाणपत्रे मिळूनही तरुणांमध्ये रोजगाराभिमुख कौशल्यांचा प्रचंड अभाव दिसून येत आहे.

### पारंपरिक पदव्यांचा फुगवटा आणि रोजगाराचा अभाव

देशात पदवी अभ्यासक्रमासाठी नोंदणी केलेल्या ३.४ कोटी विद्यार्थ्यांपैकी एकट्या बीए शाखेत १.१३ कोटी विद्यार्थी आहेत; तर बीकॉम आणि बीएससी या पारंपरिक शाखांमध्ये तब्बल दोन कोटींहून अधिक तरुण शिक्षण घेत आहेत. मात्र या पदव्या थेट रोजगार मिळवून देण्यात पूर्णपणे अपयशी ठरत आहेत.

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी काही दिवसांपूर्वी 'द इंडियन एक्स्प्रेस'ला दिलेल्या मुलाखतीत या गंभीर समस्येकडे लक्ष वेधले होते. "आपले प्रचलित अभ्यासक्रम विद्यार्थ्यांना ना नोकरीसाठी तयार करतात, ना उद्योजक बनण्यासाठी," अशी परखड टिप्पणी त्यांनी केली होती. अर्थशास्त्र किंवा राज्यशास्त्रात बीए आणि एमए केल्यानंतरही संशोधनाचा मार्ग वगळता या तरुणांपुढे नेमकी कोणती व्यावसायिक दिशा असते, असा सवाल सीतारामन यांनी उपस्थित केला होता.

### ८० टक्के विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष कामाच्या अनुभवाची उणीव

अहवालानुसार, शिक्षण व्यवस्थेतील त्रुटी केवळ आकडेवारीत नसून प्रत्यक्ष विद्यार्थ्यांच्या अनुभवातही स्पष्ट जाणवत आहेत. ८० टक्के विद्यार्थ्यांच्या मते, अभ्यासक्रमात प्रत्यक्ष कामाचा अनुभव आणि प्रात्यक्षिकांचा अभाव ही सर्वात मोठी अडचण आहे.

३४ टक्के तरुणांनी कौशल्यांच्या अभावामुळे नोकरी मिळण्यात अडचणी येत असल्याचे नमूद केले. १८ टक्के विद्यार्थ्यांना मुलाखतीची तयारी कशी करावी याचे कोणतेही मार्गदर्शन मिळत नाही.

वाणिज्य शाखेच्या विद्यार्थ्याला हिशोबाचे प्राथमिक ज्ञान असले तरी 'टॅली' किंवा डिजिटल टूल्स वापरता येत नाहीत; अर्थशास्त्राचा पदवीधर कंपनीचे आर्थिक विश्लेषण करू शकत नाही, अशी परिस्थिती असल्याचे अहवालात अधोरेखित करण्यात आले आहे.

सरकारी नोकऱ्यांवर अवाजवी भार

खासगी क्षेत्रातील आवश्यक कौशल्ये नसल्यामुळे पदवीधरांचा मोर्चा सरकारी नोकऱ्यांकडे वळत असल्याचे चित्र आहे. निती आयोगाच्या आकडेवारीनुसार, नोव्हेंबर २०२४ ते जुलै २०२५ या कालावधीत सरकारी क्षेत्रातील अवघ्या ५५ हजार पदांसाठी १ कोटी ८६ लाख अर्ज आले होते.

केवळ सरकारी नोकऱ्या वाढवणे हा या समस्येवरचा उपाय नसून, शिक्षण व्यवस्थेने स्वयंरोजगार, कौशल्याधारित उद्योग आणि उद्योजकतेसाठी आवश्यक सक्षम वातावरण तयार केले पाहिजे, अशी भूमिका अहवालात मांडण्यात आली आहे. महाविद्यालये आणि उद्योग जगतातील ही दरी भरून काढण्यासाठी इंटर्नशिप आणि अद्ययावत प्रात्यक्षिक प्रशिक्षणाची तातडीने गरज व्यक्त केली जात आहे.

23 August 2026 page 02_Layout 1 22-08-2026 06:41 PM Page 1



# हिरवळलेल्या मनाचा काव्यसंवाद

कविता ही केवळ भावनांची नोंद नसते, तर मनाच्या अंतरंगात उमटणाऱ्या अनुभूतींची सूक्ष्म स्पंदने असतात. मनही विलक्षण असते. कधी पहिल्या पावसाने चिंब भिजलेल्या मातीसारखे ओलसर, तर कधी उन्हाने करपलेल्या जमिनीसारखे रखरखीत; कधी अनपेक्षित आनंदाने हिरवेगार होत जाणारे, तर कधी दुःखाच्या गडद छायेत कोमेजून जाणारे. कवितेचे सामर्थ्य हेच की ती दुःखाला नाकारत नाही; मात्र त्याला अंतिम सत्यही मानत नाही. ती अश्रूंना शब्द देते आणि त्या शब्दांतूनच जगण्याची नवी पालवी शोधते. ‘मन जेव्हा हिरवळले’ हा मंजुषा कउटकर यांचा कवितासंग्रह वाचताना कवितेची ही ताकद प्रकर्षाने जाणवते. हा कवितासंग्रह न्याहाळताना त्याच्या काव्यात्म शीर्षकाचा आणि देखण्या मुखपृष्ठाचा हिरवट, ओलसर गंध थेट मनात शिरतो. “कवितेच्या जन्माने हिरवळण्याचे सामर्थ्य ज्यातून प्राप्त होते त्या सुख-दुःखास... त्या भवतालास...” या अर्पण पत्रिकेतून कवयित्रीची भावभूमी स्पष्ट होते. मन हिरवळणे सहज घडत नाही; अनुभवांच्या मातीत भावनांचे बीज रुजावे लागते. सुखाच्या सरींबरोबर दुःखाचे उन्हाळेही सोसावे लागतात. म्हणूनच या संग्रहातील हिरवळ ही केवळ प्रसन्नतेची हिरवाई नसून कडू-गोड अनुभवांनी चिंब झालेल्या मनाची हिरवाई आहे. कवयित्रीच्या मनातील वेदना शब्दरूप घेताना दिसतात. ‘व्रण काळजात काही भार सोसवत नाही, उगा कातर वेळेला त्याची ठसठस राही...’ भोवतालच्या जगण्याकडे कवयित्री केवळ पाहत नाही, तर ते अंतःकरणाने अनुभवते. घटना, नाती, आठवणी, वेदना आणि निसर्गातील क्षण तिच्या मनाला स्पर्शून जातात आणि त्यांचे रूपांतर कवितेत होते. ‘माझी लेखणी’ या कवितेत ती म्हणते, ‘तिने पहावा श्रावण आणि वसंत पहावा वंचितांच्या वेदनेचा तिने मागोवाही घ्यावा...पण काळोखाच्या हाती एक पणतीही द्यावी...’ या ओळींतून तिच्या कवितेची सामाजिक बांधिलकी स्पष्ट होते. तिची लेखणी केवळ सौंदर्य अनुभवत नाही, तर वंचितांच्या वेदनांचाही मागोवा घेते. ‘भूक’ या कवितेत रस्त्याच्या कडेला तवा-कढई विकणारी स्त्री आणि तिचे लेकरू येते, तर ‘गावाकडचे रस्ते’ बालपणीच्या आठवणी जाग्या करतात. ‘आता एक कर...’ या कवितेत सोशिक स्त्रीला आत्मभानाचा सल्ला देताना कवयित्री म्हणते, ‘खोट्या आशा उधार दिलासे रोख अपेक्षांची बीजं...त्याचंच बाभूळबन उगवलं सभोवती...’ स्त्रीने केवळ त्याग आणि सहनशीलतेचे उदात्तीकरण न करता स्वतःच्या जगण्याकडे वळावे, असा संदेश येथे आहे. ‘कालची फुलं कालच माळायची होतीस गजऱ्यात’ या प्रतिमेतून संधी निघून गेल्यावर पश्चात्ताप करण्यापेक्षा वर्तमानाचा स्वीकार करण्याची जाणीव व्यक्त होते. ही सामाजिक दृष्टी कवयित्रीला सावित्रीमाई फुले यांच्या विचारांतून लाभलेली आहे. ‘आई सावित्री’, ‘हे क्रांतीसूर्या’, ‘कर्मयोगी सावता माळी’, ‘आई जिजाऊ’, ‘भिमराया’ अशा कवितांतून महापुरुषांविषयीचा आदर व्यक्त होतो. ‘भिमराया’ कवितेत ती म्हणते, ‘सूर्या तुझ्यामुळे पंखा बळ आले, वस्तीस मिळाले ज्ञानदिवे.’ या व्यक्तिमत्त्वांचा केवळ गौरव न करता त्यांच्या विचारांचा आजच्या जीवनाशी असलेला संबंध कवयित्री अधोरेखित करते. समता, स्वाभिमान, श्रमप्रतिष्ठा आणि सामाजिक न्याय यांचा जागर या कवितांतून घडतो. घर, संसार, नाती आणि स्त्री जीवनाच्या अनुभवांपासून सुरू झालेली कवयित्रीची कविता व्यापक सामाजिक अवकाश व्यापते. वैयक्तिक अनुभवातून सामाजिक जाणीवेकडे आणि स्वानुभवातून परिवर्तनाच्या आकांक्षेकडे तिची वाटचाल होते. या संग्रहात निसर्ग कविताही मोठ्या प्रमाणात असून ती कवयित्रीच्या व्यक्तिमत्त्वाप्रमाणे नाजूक आणि हळवी आहे. कधी कवयित्रीचे मन अंतःर्मुख होऊन स्वतःशी संवाद साधते. ‘चल ऐहिकाच्या पार’ ही प्रगल्भ जाणिवेची कविता आहे, ‘चल ऐहिकाच्या पारकर, उघडे दारकर रिकामे घर संसाराचे...’ या कवितेत देहाच्या क्षणभंगुरतेची जाणीव आणि देहमुक्तीची आस जाणवते. ‘उधार श्वास’, ‘सावळ भेटी’, ‘जिवा तारण्यासाठी निळा भास’ अशा प्रतिमांतून अस्तित्वाच्या अनिश्चिततेचे भान प्रकटते. ‘मन जेव्हा हिरवळले’ हे संग्रहाचे शीर्षकच एका भावावस्थेचे सूचक आहे. मन कोरडे असताना कविता उमलत नाही; आतून काहीतरी भिजावे, हलावे आणि कधी खुलावेही लागते. अशा भिजलेल्या, व्याकुळ पण जगण्यावर विश्वास ठेवणाऱ्या मनातून या कविता उमलल्या आहेत. म्हणूनच या कवितांचा आस्वाद घेताना ‘हिरवळणे’ आणि ‘हुरहुरणे’ या दोन्ही भावनांचा अनुभव येतो. परिस पब्लिकेशनने प्रकाशित केलेल्या या कवितासंग्रहाला ज्येष्ठ कवी अशोक नायगावकर यांची प्रसन्न प्रस्तावना लाभली आहे. ‘या कवितेत भविष्यातील पाऊलखुणा जाणवल्या...’ हे त्यांचे निरीक्षण कवयित्रीच्या पुढील प्रवासासाठी आश्वासक आहे. प्रा. अशोक बागवे यांनीही शुभेच्छा देताना या संग्रहातील स्त्रीमनाच्या अव्यक्त वेदनेचा वेध घेतला आहे. त्यांच्या मते हा संग्रह स्त्रीच्या अंतर्मनातील अव्यक्त मौनाचा सल व्यक्त करणारा आहे. मंजुषाच्या पहिल्याच कविता संग्रहाला अशा दिग्गजांचे आशीर्वाद लाभणे ही तिच्या काव्यलेखनाची मोठी पावती आहे. तिच्या मनातील ही हिरवळ अशीच अनुभवांनी समृद्ध होत राहो; तिची कविता अधिक सजगतेने, सहजतेने आणि समग्रतेने फुलत राहो, याच मनःपूर्वक शुभेच्छा.●●






डॉ सुनंदा बोरकर जुलमे
मो. 8766422475

# दुर्लक्षित कार्यकर्त्यांच्या कार्याचा लेखाजोखा

जातीयता, वर्णभेद, काळा-गोरा या मनुष्यत्व नाकारणाऱ्या व्यवस्थेविरुद्ध बंड पुकारून व्यवस्थेला सुरुंग लावण्याचे काम जगभरातील असंख्य समाजसुधारकांनी केलेले आहे. शोषण, अन्याय-अत्याचाराची भूमी ही केवळ भारत नाही, ती जगभरातही अस्तित्वात होतीच. फरक इतकाच की, भारतातील व्यवस्थेने कहर करीत अन्याय-अत्याचाराला ऊत आला होता. यात शिकार होणारा वर्ग दलित, आदिवासी, भटके, वंचित, उपेक्षित, मजूर, कष्टकरी, शेतकरी, भूमिहीन हा होता. अन्याय-अत्याचाराला कुठेतरी रोखले पाहिजे, हा रोष समग्र दलित-उपेक्षितांच्या मनात निर्माण झाला होता. डॉ. बाबासाहेबांच्या महापरिनिर्वाणानंतर स्वार्थी नेत्यांच्या कंपूने राजकीय हात मिळवणी करून व्यक्तिगत स्वार्थापायी समाजाला कुणाच्यातरी दावणीला बांधण्याचे काम सुरू केले. याची प्रचंड चीड, राग सर्वांच्या मनात खदखदत होता. त्याचा उद्रेक होऊन नक्कीच ज्वालामुखी होईल हे सत्य असतानाच समाजाला योग्य दिशा देणारा अराजकीय नेता पुढे येईल, त्याच्या मागे जनता एकसंघ उभी राहील अशी अवस्था होती. नेमक्या याच वेळेस १९७२ साली दलित पँथर उदयास आली. अवघ्या दोन-अडीच वर्षांत दलित पँथरने महाराष्ट्राच्या नकाशावर आपला ठसा उमटवला. सर्वसामान्यांना हीच आपली हक्काची संघटना असून ती आपल्याला स्वाभिमान मिळवून देईल, अशी भावना निर्माण झाली. असंख्य तरुण पँथरमध्ये सामील झाले आणि खेडोपाडी गावोगावी दलित पँथर पोहोचली. अन्यायाविरुद्ध पेटून उठलेल्या एच. पी. न्यूटन आणि बॉबी सील या अमेरिकेतील तरुणांनी १५ ऑक्टोबर १९६६ रोजी ‘ब्लॅक पँथर पार्टी फॉर सेल्फ डिफेन्स’ ही संघटना स्थापन केली. तिच्या प्रेरणेने जगातील विविध देशांत पँथर नावाच्या संघटना निर्माण झाल्या. भारतात २९ मे १९७२ रोजी दलित पँथरची स्थापना झाली. ‘ब्लॅक पँथर’ची प्रेरणा असली तरी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार हेच संघटनेच्या स्थापनेमागील प्रमुख प्रेरणास्त्रोत होते. ‘शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा’ या संदेशानुसार दलित पँथरने संघर्षाची दिशा स्वीकारली. चळवळीचा इतिहास केवळ पुस्तके वाचून लिहिता येत नाही. तो प्रत्यक्ष अनुभवावा, जगावा आणि अभ्यासावा लागतो. चळवळीतील प्रसंगांचे साक्षीदार असलेल्या कार्यकर्त्यांच्या लेखणीतून त्या इतिहासाला सत्याची धार प्राप्त होते. मात्र चळवळीचा गंध नसणाऱ्यांनी चार भिंतीत बसून तिच्यावर पीएच.डी.चे प्रबंध लिहिण्याचे प्रकारही दिसतात. ॲड. के. डी. अर्थात धम्मकिरण चन्ने हे आंबेडकरी विचारांनी प्रेरित असलेले तळमळीचे कार्यकर्ते आहेत. त्यांनी ठाणे जिल्ह्यातील दुर्लक्षित पँथर कार्यकर्त्यांच्या त्यागाचा जीवनपट ‘प्रज्ञासूर्याची किरणे’ या पुस्तकातून मांडला आहे. यापूर्वी ज. वि. पवार, अर्जुन डांगळे, प्रा. विठ्ठल शिंदे, जयदेव गायकवाड आदींनी दलित पँथरचा इतिहास मांडला आहे. प्राचार्य रमेश जाधव यांनी ‘पँथर हा दरारा आमुचा’ या पुस्तकातून ठाणे जिल्ह्यातील कार्यकर्त्यांचा इतिहास सांगितला आहे. ‘प्रज्ञासूर्याची किरणे’मध्ये ठाणे जिल्ह्यातील उपेक्षित पँथर कार्यकर्त्यांबरोबरच सुरेश सावंत आणि अन्य नेत्यांच्या सहकार्याने उभारलेले युवक रिपब्लिकन, कामगार संघटना, कामगार चळवळ आणि सत्याग्रह यांचा इतिहास १७ प्रकरणांत मांडला आहे. अनेक तरुणांनी चळवळीत काम करताना नोकऱ्या गमावल्या, काहींनी प्राण गमावले; परंतु त्यांचा संघर्ष पुढील पिढीला प्रेरणा देणारा ठरावा, या हेतूने हा इतिहास लिहिला आहे. लेखकाने आपल्या मनोगतात दलित पँथरपासून भारिप बहुजन महासंघ, सेक्युलर मुव्हमेंट आणि वंचित आघाडीपर्यंतचा प्रवास मांडला आहे. नोकरी आणि शिक्षण सांभाळून सामाजिक चळवळीत काम करणाऱ्या ज्ञात-अज्ञात कार्यकर्त्यांचे योगदान पुढील पिढीसमोर यावे, हा या लेखनामागील उद्देश आहे. सुरेश सावंत यांचे नेतृत्व, बी. जी. तथा अण्णासाहेब धनगर यांचा संघर्ष आणि त्यांच्या पत्नीची अन्यायकारक बदली रद्द करण्यासाठी १६ जुलै १९७४ रोजी काढलेला शहापूर मोर्चा यांसारखे अनेक प्रसंग पुस्तकात आहेत. या मोर्चामुळे मागासवर्गीय शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांमध्ये स्वाभिमान जागृत झाला. १४ एप्रिल १९७७ रोजी युवक रिपब्लिकनची स्थापना करण्यात आली. सुरेश सावंत, के. डी. चन्ने, अरविंद निकाळजे, श्रीकांत तळवटकर, अर्जुन कांबळे, मधुकर गायकवाड, दिलीप कासारे, संजय कांबळे आणि सुरेश भोसले हे संस्थापक सदस्य होते. बौद्धांच्या सवलतीच्या प्रश्नावर तत्कालीन प्रधानमंत्री मोरारजी देसाई यांच्या विरोधातील आंदोलन आणि संसदेत पत्रके फेकून केलेले आंदोलन यामुळे युवक रिपब्लिकनची भूमिका चर्चेत आली. ॲड. प्रकाश तथा बाळासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली १९८३ मध्ये नाशिक ते मुंबई लाँगमार्च काढण्यात आला. ठाणे जिल्ह्यातील कार्यकर्त्यांनी गावोगावी बैठका घेऊन जनतेला या आंदोलनात सहभागी केले. पुढे रिपब्लिकन जनरल कामगार युनियन, इंडियन सोशल मुव्हमेंट, सेक्युलर मुव्हमेंट, समता एज्युकेशन सोसायटी आणि डॉ. माईसाहेब आंबेडकर यांच्या सहवासातील आठवणींचीही नोंद पुस्तकात आहे. ●●

प्रज्ञासूर्याची किरणे
लेखक : ॲड. के. डी. चन्ने (९८२००१६६१२),
पृष्ठे : १२५, मूल्य : २०० रुपये.




प्रदीप जाधव
मो. ९८६९१०२२२६

# ही संघर्षमूल्य व जीवनमूल्यांची कविता आहे !

## नयी सुबह के रंग

मराठी व आंबेडकरी साहित्य जगतात ठळकपणे अधोरेखित असलेले एक नाव म्हणजे पुलगाव, जि. वर्धा येथील कवी संजय ओरके होय. राज्यात समता सैनिक दलाचे निष्ठावान व कृतीशील कार्यकर्ते, चित्रकार, शिक्षक, प्रतिभाशाली कवी व समीक्षक म्हणून ते परिचित आहेत. त्यांचा पहिला कवितासंग्रह ‘निरंतर संघर्षरत राहण्यासाठी’ काही वर्षांपूर्वी प्रकाशित झाला होता. दीर्घकाळानंतर समता सैनिक दलाच्या स्थापनेच्या शतक महोत्सवी पर्वावर साहित्य जगतात अलीकडेच त्यांच्या दोन कविता संग्रहांचे पदार्पण झाले आहे. ‘हे भारत राष्ट्र आहे’ (मराठी) आणि ‘नयी सुबह के रंग’ (हिंदी). हे दोन्ही कवितासंग्रह दमदार आहेत. संजय ओरके हे समता सैनिक दलाचे राष्ट्रीय संघटक म्हणून कार्यरत आहेत. नोकरीसोबतच आपल्या सकस, दिशादर्शक आणि प्रेरक कार्यातून तसेच संघटन कौशल्यातून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांची नव्या पिढीत रुजवणूक करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य ते करीत आहेत. त्याच कार्याचे प्रतिबिंब त्यांच्या कवितेत दिसून येते. ओरके हे वास्तवाचे भान असलेले आणि देशातील वर्तमान स्थितीवर परखडपणे भाष्य करणारे कवी आहेत. त्यांची कविता व्यवस्थेला प्रश्न विचारते आणि चळवळीत जागृतीचा अग्नी सतत तेवत ठेवते. कवी कुणाचीही भीडभाड न ठेवता आपले म्हणणे समाजासमोर मांडतो. सामाजिक वास्तव, संघर्ष, परिवर्तन आणि मानवी मूल्ये ही त्यांच्या कवितेची प्रमुख केंद्रे आहेत. त्यामुळे त्यांची कविता केवळ भावना व्यक्ती न राहता सामाजिक जाणीव निर्माण करणारे प्रभावी माध्यम ठरते. आपल्या लेखणीच्या माध्यमातून त्यांनी आपल्यातील कार्यकर्ता आणि साहित्यिक सतत जागा ठेवला आहे. संजय ओरके दूरदृष्टी बाळगणारे माणुसकीचे कवी आहेत. येणाऱ्या काळातील बदलांचा अंदाज घेत परखड भूमिका घेऊन आपल्या साहित्याची आणि कार्याची दिशा ते ठरवितात. याचा प्रत्यय त्यांच्या हिंदी-उर्दू कवितासंग्रह ‘नयी सुबह के रंग’मधून येतो. या संग्रहातून त्यांनी हिंदी साहित्यविश्वात दमदार प्रवेश केला आहे. सामाजिक अभिसरणाच्या पार्श्वभूमीवर व्यथा, वेदना, दया, प्रेम, करुणा, निराशा, संवेदना, संघर्ष आणि परिवर्तन या विविध भावछटांची नवी पहाट त्यांच्या कवितेतून उगवताना दिसते. संग्रहातील रचना वाचकाला केवळ विचार करायला लावत नाहीत, तर आपल्या सामाजिक जबाबदारीची जाणीवही करून देतात. या संग्रहात एकूण १०३ रचनांचा समावेश असून त्या सर्व मुक्तछंदातील आहेत. कवी हा संग्रह वाचकांच्या स्वाधीन करताना म्हणतो, “टुकडे है मेरे दिल के जो मैं तुम्हारे हवाले कर रहा हूँ!” या ओळींतून कवीच्या मनातील प्रामाणिकपणा आणि संवेदनशीलता व्यक्त होते. ओरकेंची कविता म्हणजे त्यांचे मनोगत आहे. त्यांचा विचार, स्पष्ट भूमिका आणि भवितव्याचा वेध घेणारी दृष्टी त्यांच्या कवितेत दिसते. देशातील वर्तमान परिस्थितीकडे पाहताना लोकशाही, संविधान आणि भारत राष्ट्राच्या संकल्पनेसमोरील आव्हाने ते अधोरेखित करतात. धर्माच्या नावावर निर्माण होणारे संघर्ष आणि त्यातून लोकशाही मूल्यांवर होणारे परिणाम याबाबत कवी अस्वस्थ आहे. त्यामुळे तो व्यवस्थेला थेट प्रश्न विचारतो, “नए राजा निकल पड़े हैं देश को विश्वगुरू बनाने मनुस्मृति लेकर! लोकतंत्र के सारे स्तंभ लगे है सलाम करने, राजाधिराज कहीं नाराज न हो जाए ! मेरा सवाल अब भी वही है भारत राष्ट्र कहाँ है?” या कवितेतून कवी राष्ट्र, संविधान आणि लोकशाही यांच्या मूलभूत संकल्पनांचा विचार करण्यास भाग पाडतो. सत्तेच्या केंद्रीकरणाबाबत आणि सामाजिक विषमतेबाबत त्याच्या मनातील चिंता स्पष्टपणे व्यक्त होते. सामान्य माणसाला प्रश्न विचारण्याचा अधिकार आहे आणि असहमती व्यक्त करणे ही लोकशाहीचीच प्रक्रिया आहे, हा विचार त्यांच्या कवितेच्या केंद्रस्थानी आहे. कवी संजय ओरके स्वतःला सूर्यकुळाशी जोडतात. वर्तमानातील काळोखातही उजेडाचा वारसा जपण्याची त्यांची भूमिका आहे. डॉ. बाबासाहेबांच्या विचारांचा वारसदार म्हणून गुलामीचा अंधार त्यांना मान्य नाही. ते म्हणतात, “सूर्यवंश से मेरे रिश्ते उजागर हैं, दुनिया में अंधेरे से सख्त नफ़रत है मुझे !” ही भूमिका केवळ काव्यात्मक नाही; ती सामाजिक बांधिलकीची अभिव्यक्ती आहे. बुद्ध, फुले, शाहू आणि आंबेडकर यांच्या विचारातून मिळालेला समतेचा प्रकाश समाजात पोहोचविण्याची जबाबदारी कवी स्वीकारतो. आमचा इतिहास हा सम्राट अशोकापासून सिद्धनाकापर्यंत आणि डॉ. बाबासाहेबांपासून आजतागायत संघर्षाचा राहिलेला आहे. त्यामुळे वर्तमान परिस्थिती बदलण्याची क्षमता समाजात आहे, असा कवीला विश्वास आहे. तो स्वतःबरोबर नव्या पिढीलाही लढवय्या सैनिकाच्या भूमिकेत पाहतो, “मैं सैनिक हूँ। भारत राष्ट्र का मेरी जिम्मेदारी है। देश और दुनिया के भीतर अमन और खुशहाली बहाल करना !” भारत राष्ट्राच्या उभारणीसाठी संघर्ष करणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे, असा संदेश कवी देतो. आत्मसन्मान, स्वाभिमान आणि स्वातंत्र्य यांचे रक्षण करण्यासाठी सज्ज राहण्याचे आवाहन त्याच्या कवितेत आहे. निद्रिस्त समाजाला जागे करण्यासाठी शब्दांबरोबर कृतीचीही गरज आहे. संविधानाचा विश्वास आणि पंचशीलाचा झेंडा हातात घेऊन पुढे जाणारा कार्यकर्ता त्यांच्या कवितेत दिसतो.गावागावांत समता सैनिक दलाच्या शाखा आणि घराघरांत भीमसैनिक घडविण्याची गरज कवी अधोरेखित करतो. सम्यक ध्येयपूर्तीसाठी सम्राट अशोकासारखे नेतृत्व निर्माण व्हावे, अशी त्याची मनिषा आहे. युद्धानंतर बुद्धाच्या विचारांकडे वळलेल्या अशोकाचा आदर्श कवीसमोर आहे. बुद्धाची करुणा, पंचशील आणि अष्टांग मार्ग मानव कल्याणासाठी आजही तितकेच महत्त्वाचे आहेत, असा त्यांचा विश्वास आहे. आंबेडकरी चळवळीने शिस्त, संघटन आणि वैचारिक स्पष्टता स्वीकारून पुढे जाणे आवश्यक आहे, अशी भूमिकाही त्यांच्या कवितेतून व्यक्त होते. कवी संजय ओरके यांची कविता पथदर्शक, दिशादर्शक, ऊर्जादायी आणि प्रेरणादायी आहे. विशिष्ट ध्येयाने प्रेरित असलेली ही डोळस कविता आहे. इतिहासाचा संदर्भ, वर्तमानाचे भान आणि भविष्याची दिशा यांचा सुंदर संगम त्यांच्या कवितेत दिसतो. ओरकेंची कविता चिंतनशीलता, अनुभव, अवलोकन, अभ्यासू दृष्टिकोन आणि एका सच्च्या कार्यकर्त्याच्या कृतीशीलतेतून जन्माला आलेली आहे. बुद्धाची करुणा, पंचशील, अष्टांग मार्ग, सम्राट अशोकाचा त्याग आणि डॉ. बाबासाहेबांचा समतेचा विचार या सर्वांचा प्रभाव त्यांच्या साहित्यकृतीवर दिसतो. धर्मांध शक्तींनी पसरविलेल्या अंधाराला भेदून उजेडाचा मार्ग दाखविण्याची ताकद या कवितेत आहे. बुद्ध, सम्राट अशोक, महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांची मशाल पुढे नेण्याचे काम ती करते. व्यवस्थेला प्रश्न विचारणे, वर्तमानातील वास्तव वाचकांसमोर ठेवणे, त्याचे परिणाम स्पष्ट करणे आणि परिवर्तनाची गरज अधोरेखित करणे हे या कवितेचे वैशिष्ट्य आहे. त्यामुळे ‘नयी सुबह के रंग’ हा केवळ कवितासंग्रह राहत नाही; तो संघर्षमूल्य आणि जीवनमूल्य अधोरेखित करणारी वैचारिक साहित्यकृती ठरतो. विविध उपमा, प्रतिमा आणि प्रतिकांच्या वापरामुळे कवितेचे सौंदर्य वाढले आहे. हिंदी-उर्दू भाषेतील संग्रहात फारसी व अरबी शब्दांचाही योग्य वापर दिसतो. मध्यमा प्रकाशन, नागपूर यांनी प्रकाशित केलेल्या या संग्रहाचे माधव लोखंडे यांनी रेखाटलेले मुखपृष्ठही बोलके आहे. या कवितासंग्रहाला ज्येष्ठ आंबेडकरी साहित्यिक व अनुवादक डॉ. युवराज सोनटक्के, बेंगळुरू यांची चिंतनशील प्रस्तावना लाभली आहे. ते म्हणतात, “ओरके की कविताएँ असमंजस के माहौल को बदलती हैं और मनुष्य को संकल्प और विकल्प की अभिप्रेरणा देती हैं!” कवी संजय ओरके यांचा ‘नयी सुबह के रंग’ हा कवितासंग्रह निश्चितच वाचकांच्या पसंतीत उतरेल. अशी मला खात्री आहे. सक्षम अशा साहित्यकृतीच्या सर्जनासाठी कवी संजय ओरके यांचे अभिनंदन व पुढील लेखनासाठी हार्दिक मंगलकामना देतो.●●






अरुण हरिभाऊ विघ्ने
मो. 8329088645

# स्वागतार्ह भूमिका

**गेल्या काही दिवसात सीजेपी आणि युवा आंदोलनाची सर्वत्र चर्चा आहे. या युवा आंदोलनाने एक आशावाद समाजात निर्माण करण्यात मोठी भूमिका बजावलेली दिसून येते. त्यामुळे सरकारला बॅकफुटवर जावे लागले तर थिंक टँकर हवालदिल जाणवले. शेवटी या वर्गाशी त्यांनी वापरून जेरीस आणलेल्या माध्यमांद्वारे संवाद साधून चुचकारण्याचा प्रयत्न केल्या जात आहे.**

इथे एक बाब लक्षात घेतली पाहिजे धार्मिक ध्रुवीकरणात अडकलेला व्हॉट्स ॲप विद्यापीठातील अंकल आणि तीस वर्षे वयोगटाच्या वरचा युवा वर्ग यांच्या वैचारिकतेला धक्का देण्याचे काम नव जेन झी गटातील युवा वर्गाने केले आहे. असे का झाले असावे ? तर याचे सरळ उत्तर आता पंधरा ते अठ्ठावीस वयोगातील युवकांसमोर आढळणाऱ्या समस्या हे आहे असे दिसते. हा वर्ग आपल्या घरात, शेजारी, नात्यात युवकांना बेरोजगार बघतो. थोड्या पगारावर कामासाठी वणवण भटकताना बघतो. कायम कामाची शाश्वती नाही. जीवनात स्थैर्याची निश्चिती नाही. उच्च शिक्षण घेऊनही काम मिळेलच याची खात्री देणारी व्यवस्था दृष्टीस पडत नाही. याचा एकत्रित परिणाम युवकांच्या मोठ्या प्रमाणातील सहभागात दिसला. वर्तमानातील प्रचलित माध्यमांचा वापर करून यंत्रणेला या आंदोलनाने खडबडून जागे केले. या आंदोलनातील भाषेवर नाके मुरडणार एक वर्ग आहे.पण विद्रोहासाठी कोणतीही भाषा वर्ज्य नाही असाच इतिहास आहे.

आता अलीकडेच सीजेपीचे संस्थापक अभिजित दिपके यांनी आपल्या कोअर कमिटीच्या बैठकीनंतर जी भूमिका जाहीर केली ती स्वागतार्ह आहे. ते म्हणाले, १) म.गांधी, पं.नेहरू आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारधारेवर सीजेपी ची वाटचाल असेल. २) कोणत्याही राजकीय पक्षात रूपांतर न करता केवळ नागरी संघटनेचा दबावगट म्हणून सीजेपी कार्य करेल. ३) धार्मिक ध्रुवीकरणाच्या विरोधात भूमिका घेतली जाईल आणि युवकांचे मार्गदर्शन करण्यात येईल.मुख्य म्हणजे सरसंघचालक भागवत यांनी जेन झीशी संवाद साधला त्यावर दिपके यांनी सरकारला सल्ला देऊन युवकांच्या भावना समजून घ्याव्या अशी टिपणी केली. एकूणच त्यांचा सध्यातरी रोख घटनेतील धर्मनिरपेक्ष मूल्याकडे दिसून येतो. गेल्या दहाबारा वर्षात नागरी दबावगट असले तरी त्यांचा आवाज दडपण्याचे प्रयत्न सातत्याने केले गेले. अर्बन नक्षल, तुकडे तुकडे गँग, देशद्रोही या शब्दात पेड ट्रोल आर्मी त्यांना नामोहरम करीत होती. त्यामुळे दिपके ही पोकळी भरून काढत असतील तर निश्चितच स्वागतार्ह अशी भूमिका आहे. लेखक, कवी, विचारवंत लोकशाही मूल्यांवर आघात करणाऱ्या घटनांवर भाष्य करीत होते आणि आहेत. संवैधानिक संस्थाच्या कार्यप्रणालीवरही प्रश्न उपस्थित करणारा वर्ग आहे. साहित्यिकांनाही मानहानीचा सामना करावा लागला. पण याचा एकत्रित बुलंद स्वर होऊ शकला नाही. सीजेपीच्या उदयामुळे आता त्यांच्यात एक विश्वास निर्माण होत असल्याची चिन्हे आढळत आहेत. लोकशाही व्यवस्थेत सत्ताधारी आणि विरोधी पक्षांची जेवढी महत्वाची भूमिका आहे तेवढीच महत्वाची भूमिका नागरी संघटनांची आहे हे आपण समजून घेतले पाहिजे. नागरी संघटना नागरिक, लोकशाही मूल्ये, संवैधानिक संस्थाच्या कारभारा बाबत जनजागृती साठी कायम अग्रेसर असतात. सध्या त्याचे स्वरूप मर्यादित झाल्याचे दिसून येत होते. ही उणीव सीजेपी भरून काढत असेल तर लोकशाही रक्षण आणि संवर्धनासाठी पोषक असेच पाऊल ठरेल. 'अखंड सावधानता हीच स्वातंत्र्याची किंमत असते.' अश्या आशयाचे एक सुवचन आहे. स्वैराचारावर लगाम लावण्यासाठी नागरी संघटना महत्वाची भूमिका बजावतात. जागल्याच्या भूमिकेत भविष्यात सीजेपी कार्य करीत असेल तर स्वातंत्र्य दिनाच्या पार्श्वभूमीवर लोकशाही व्यवस्थेसाठी हे आश्वासक असे संकेत आहेत.●●






अनिरुद्ध कांबळे
मो.9922959770

## अंधश्रद्धा व वैज्ञानिक दृष्टिकोन

नको ठेऊ रे मानवा, अंधश्रद्धा अंधभक्ती,
डोक्याने तपासून पहा, खऱ्या खोट्याची प्रचीती.
अंधश्रद्धेच्या गोत्यात साऱ्या जीवनाची अधोगती,
दृष्टि वैज्ञानिक स्वीकारा, होइल सर्वांगीण प्रगती...1

गाडगेबाबा कीर्तनात ,म्हणे देव कुठं असते,
देव नसतो मंदिरात पुजाऱ्यांचे पोटं असते,
न शिकलेला गाडगेबाबा, शोधतो सत्यनीति ,
दृष्टि वैज्ञानिक स्वीकारा, होइल सर्वांगीण प्रगती

पिंडदाना ला बापाच्या दोन तीन कावळे शिवत होते,
मुलगा आईला विचारे, माझे बाप किती होते,
अशा प्रथा परंपरा , अंध-श्रद्धेची उत्पत्ती,
दृष्टि वैज्ञानिक स्वीकारा, होइल सर्वांगीण प्रगती

लिंबू मिर्ची भुत करणी, विवेकी बुद्धिला पटत नाही,
बुवा बाबाच्या मंत्राने, भाजला पापड तुटत नाही.
घटने मागे कारण भाव हे सत्य ठसवं मनचित्ती,
दृष्टि वैज्ञानिक स्वीकारा, होइल सर्वांगीण प्रगती.

-चित्तरंजन चौरे

## कुठे स्वतंत्र भारत

रस्ता शाळेत जाण्याचा
करा दुरुस्त नेत्यांनो
शोधु चंद्रावरी मार्ग
आम्ही पुढे नाकर्त्यांनो
कुठे झालाय स्वतंत्र
सांगा आजचा भारत
खरे बोले तोच गुन्हा
चोरा हाती महारत
जिल्हा परिषद शाळा
झाल्या ओसाड गावात
चपराशी देई विद्या
गुरूविन विझे वात
भ्रष्टाचार मुक्त नसे
आता कोणते शिक्षण
पेपरफुटीचा रोग
करी रक्षक भक्षण
रेष निर्लज्जपणाची
पोलिसांनी गाठलीय
लेकीसम मुलीं वार
अंगी चोळी फाटलीय
अनुदान खिशामध्ये
अधिकारी खाऊ सारी
मुली झोपलेल्या मेल्या
सर्पदंश झाला भारी
कन्या भारतीय भिते
कोणी न्याय देत नाही
आंदोलन लढतांना
विद्येसाठी मृत काही
धूर सोन्याचा निघतो
होता प्रसिद्धीचा देश
आज कर्जाचा डोंगर
हसतात सारे देश
तेव्हा मिळेल स्वातंत्र्य
चोरी नसेल राऊळी
माणुसकी जात श्रेष्ठ
धर्म वाद चढो सुळी...

- डॉ .शील बागडे



## काव्यफुले

संयोजक : प्रा. भीमराव गायकवाड
मो. 9822507225
बहुजन सौरभ

## स्वातंत्र्य दिन




पोहोचू दे लख्ख प्रकाश
तुझा एवढा
कुण्या 'जपतलाई'त सर्पदंश होऊ नये
दूर करण्या अंधार त्या निष्पाप वनातील
आग लावण्या मशाल मनामनात पेटू दे
उप-योजनेची तरतूद गेली कुठे ?
वळती झालेला वाटा परत मिळू दे
वंचनेचे मूळ शोधणारी सूर्यसंवेदना
स्वयंप्रकाशित समता सैनिक लाभू दे
बा भीमाचे इशारे ध्यानात घेऊन
रक्तविहीन क्रांतीचा एल्गार होऊ दे
तुझी फळं चाखण्या आतुर वस्तीत
काळजावर संविधानिक भारत कोरु दे

- महेंद्रकुमार मेश्राम

## पश्चाताप



कधी कधी आपण अगदी छोट्या
छोट्या
गोष्टींचा विचार करत बसतो...
“तेव्हा असं वागायला नको
होतं...”
“आपण तसं बोललो नसतो
तर...”
“त्यावेळी थोडे वेगळे वागलो असतो तर...”
त्या क्षणी त्या गोष्टी छोट्या वाटतात,
पण नंतर जाणवतं की याच छोट्या गोष्टी आपल्या मनावर,
नात्यांवर आणि कधी कधी संपूर्ण
आयुष्यावर मोठा परिणाम करून गेलेल्या असतात.
म्हणून प्रत्येक क्षण जपून जगा,
शब्द बोलण्याआधी विचार करा आणि
नाती तुटण्याआधी त्यांची किंमत ओळखा.
कारण काही गोष्टी वेळ निघून गेल्यावर सुधारता येत नाहीत...
फक्त त्यांचा पश्चात्ताप मनात घेऊन जगावे लागते.

- डॉ जयप्रकाश बोधी

## स्वातंत्र्याच्या छटा

तारकांच्या मंडपात
बेधुंद निशा सजली,
वर्षगाठ स्वातंत्र्याची,
काळरात्र मावळली.
गगनभेदी इमारती,
लुकलुकत्या तारका,
चंद्र गवसला आकाशी,
सूर्यमंडल फिका.
सजल्या दाही दिशा,
विज्ञानाचा उमलला झरा,
नवलाई भौतिकतेची,
माणुसकीचा पाचोळा.
भ्रष्टाचाराचा मुकुट चढे
रात्रीच्या काळोखात,
लक्तरे लोकशाहीची
संसदेच्या मंदिरात.
चारित्र्याचा शब्द खंगला,
नैतिकतेला गळफास,
चोराच्या उलट्या बोंबा,
आदर्श जनांचा उपहास.
नववधू शृंगारली
अर्थसंकल्पी बोट,
लांडग्याने मोती टिपले,
शिंपल्यांची मात्र मोट.
आंधळे दळते अन्
कुत्रे पीठ खाते,
दळणे दळून गेले,
बोंब तीन दिवस राहते.
मावळतीच्या सूर्याने
पेटविले रान,
कापली धरती,
अन्ना मेहरबान.
निखारे काजळले,
ओसरता लाट,
पर्णकुटीवर पुन्हा
पाखरांचा सुळसुळाट.

- मदनलाल उके

## मानवी मूल्य तुडवले कोणी?

स्वातंत्र्य कोणाचे,
कोणासाठी?
रास्त मागणी केली तरी
मिळते लाठी,
शिक्षणात भ्रष्टाचार,
चोरी अन् लूट,
हेच का स्वातंत्र्य?
जगण्यासाठी आजही लढतोय
माणूस! ॥१॥
लाल किल्ल्यावरून भाषण,
डोलतो देश तालात,
रोजगार हरवला, शिक्षण
हरवले,
भविष्य गेले अंधारात!
नागपंचमी आली की दूध
टाकतो वारुळात,
अंधश्रद्धेचा कळस—
स्वतंत्र देशात! ॥२॥
आरोग्य महागले,
जीवनाच्या वाटेवर हाल
बेहाल,
आजही स्त्री अंधश्रद्धेच्या
चौकटीत,
नवस, धागा अन् दोऱ्यांच्या
जाळ्यात!
कर्माच्या अंधारात हरवली
वाट,
देव येतो का हो धावून,
पडतो जेव्हा संकटात? ॥३॥
या देशात स्वातंत्र्य लुटले
कोणी?
मानवतेची मूल्ये पायाखाली
तुडवली कोणी?
जालियनवाला बागेत झाले
होते
कुरघोडीचे कारस्थान,
आजही घडते अन्यायाची
पुनरावृत्ती
झारखंड अन् जंतर-मंतरच्या
मैदानात! ॥४॥

-इंजि. शुद्धोधन बडवणे

## झोपलेली माणसे

माणसाच्या माणूसकीला
क्षणांत विसरती माणसे
विश्वासाला तळा देऊनी
गळा कापती माणसे
कपाळी टिळा लावून लळा
रंगात दिसती माणसे
मतलबी भोळे पणाच्या
ढंगात फसती माणसे
इतरांचे वैभव बघूनी
का बरं झुरती माणसे
नसे भरवसा आता कुणाचा
अकस्मात मरती माणसे
अमाप धन असतांनाही
लोभात जगती माणसे
सुसाट वाऱ्याच्या झोताने
दिशा बदलती माणसे
आयुष्यातील अमुल्य क्षण
व्यर्थ का घालती माणसे
शेवट अपुला मातीतच हे
विसरून जाती माणसे
आपत्ती येता पळून जाती
लपलेली ढोंगी माणसे
माणूसकीला कलंकित करती
निवांत झोपलेली माणसे

- आर .एस .तायडे

## देशाप्रति माझे कर्तव्य

देशाप्रति माझे कर्तव्य
निभावताना अभिमान,
संविधानाचा आदर करीत
मूल्यांचा करते गुणगान.
देशाचे सारे कायदे पाळणे,
यातच माझी खरी शान,
मतदानाचा हक्क बजावताना
जबाबदारीचे असो भान.
जात, धर्म, प्रांत, भाषा यांचा
नको कुठलाही भेदभाव,
स्त्री-पुरुष समानतेच्या वाटेवर
माणुसकीचा असो ठाव.
महिलांच्या सन्मानासाठी
सदैव जागरूक राहीन,
समानतेच्या सुंदर विचारांनी
नवा समाज घडवीन.
पर्यावरणाचे संरक्षण करून
पाण्याची करीन बचत,
अंधश्रद्धा, द्वेष, अफवांपेक्षा
वैज्ञानिक दृष्टिकोनाची धरिन वाट.
गरजू, अनाथांच्या मदतीसाठी
सदैव पुढे राहीन,
रक्तदानाच्या पवित्र कार्याने
मानवतेची सेवा करीन.
देशाची अखंडता जपण्यासाठी
कर्तव्य सदैव निभावीन,
डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या
संविधानाचा मान राखीन.
देशाप्रति माझे कर्तव्य
हीच माझी ओळख महान,
संविधान, समता, बंधुता
यांचाच सदैव करू गुणगान.

- मीनाक्षी दमयंती

## आजार देतो संकेत

शारीरिक आजाराला
नाहीयेत वळवता
मानसिक वेदनेला
येत नसते सांगता
व्यवहारीक जीवन
संसार बहुमूल्याचा
कुटुंब पालनासाठी
पैसा मात्र कमाईचा
आयुष्यात सुखदु:खे
टळणारी नसतात
संसाराच्या
ओझ्याखाली
सहन केली जातात
वृद्ध अवस्था होताना
दिसत नाही स्वत:ला
कंपणारे हात पाय
दर्शवतात दु:खाला
चिंताग्रस्त माणसाचे
आयुष्य चिमटा घेते
हे सर्व कळण्याआधी
तोल जाणे सुरू होते
कौटुंबिक परिस्थिती
स्वत:ला कोसू लागते
डोळ्यासमोर संसार
तो सुखाचाच पाहते
म्हातारपण दे देवा
असे कोणी म्हटले का
बालपण देगा देवा
पुन्हा कधी मिळाले का
साधू संत हे नेहमी
असे बहु आयुष्याचे
संसाराची चिंता नाही
चिंतामुक्त जगायचे
बिमारीच्या परीक्षेत
नापास होते शरीर
कालबाह्य औषधीने
होतोय मेंदू बधिर
आजार देतो संकेत
पण लक्ष देत नाही
परिस्थिती तडजोड
करत नसते काही

- जीवन खोब्रागडे

# पुण्यात ‘बहुजन सौरभ’चा आवाज

## ‘बातमी कशी लिहावी’ कार्यशाळा

दैनिक ‘बहुजन सौरभ’चा वाचकवर्ग वाढवण्यासाठी आणि वृत्तपत्राचा विचार घरोघरी पोहोचवण्यासाठी आमचे सातत्याने प्रयत्न सुरू आहेत. नागपूर शहरात मुद्रित आवृत्ती वाचकांसाठी सहज उपलब्ध आहे. मात्र, नागपूरबाहेर डिजिटल आणि ऑनलाइन माध्यमांतून मोठा वाचकवर्ग निर्माण झाला असून, ही संख्या आता लाखाच्या आसपास पोहोचली आहे. ‘मूकनायक’ या ऐतिहासिक वृत्तपत्राच्या जन्मशताब्दी वर्षात, मूकनायकाचा वैचारिक वारसदार म्हणून ‘दैनिक बहुजन सौरभ’चा जन्म झाला. त्यामुळे हे केवळ वृत्तपत्र नसून बहुजन विचारांची आणि संघर्षाची परंपरा पुढे नेणारे एक सशक्त माध्यम आहे. वृत्तपत्राचा प्रसार आणि खप वाढवण्यासाठी आम्ही नागपूर शहर अक्षरशः पिंजून काढले आहे. हळूहळू भागधारक वाढत आहेत आणि वृत्तपत्राची यशस्वी वाटचाल सुरू आहे. नागपुरातून प्रकाशित होणारे बहुजन विचारांचे हे एकमेव दैनिक असून, या विचारपत्राला समाजातील विविध घटकांचे सहकार्य मिळत आहे. परंतु, अपेक्षित खपाचा टप्पा अद्याप गाठता आलेला नाही, हे खेदाने सांगावे लागते.‘बहुजन सौरभ’ची टीम जिथे जाते, तिथे वृत्तपत्राचा प्रचार-प्रसार मनापासून करते. आज आम्ही कुठेही उभे राहिलो तरी, ‘हे बहुजन सौरभचे लोक आहेत,’ अशी एक वेगळी आणि स्वाभिमानी ओळख निर्माण झाली आहे. विद्यार्थी जीवनापासून सोबत असलेले अनेक सहकारी आजही खांद्याला खांदा लावून सक्रिय आहेत. हीच निष्ठा आता वृत्तपत्राच्या कार्याला पुढे घेऊन जात आहे. याच प्रसाराचा एक भाग म्हणून पुण्यात ‘बातमी कशी लिहावी’ ही विशेष कार्यशाळा आयोजित करण्यात आली. पुण्याची ऐतिहासिक भूमी आणि कार्य प्रेरणा पुण्यात काम करण्याची मुख्य प्रेरणा ‘बामसेफ’ संघटनेकडून मिळाली. बामसेफचा उदय कोणत्याही प्रसिद्धीच्या झगमगाटाविना झाला. बामसेफने रस्ते, पूल आणि भिंतींनाच आपले मीडिया बनवले होते. या चळवळीची सुरुवात पुण्यातूनच झाली. पुणे हे सामाजिक आणि वैचारिक क्रांतीचे




ऐतिहासिक केंद्र आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचा काळ, पेशवाई, भीमा-कोरेगावचा लढा, लोकमान्य टिळक, आगरकर, रानडे यांचा काळ असो किंवा महात्मा जोतीराव फुले, क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले, लहुजी साळवे आणि फातिमा शेख यांच्या कार्याची भूमी असो, पुण्याचे सामाजिक महत्त्व अलोट आहे. अशा वैचारिकदृष्ट्या सजग शहरात ‘दैनिक बहुजन सौरभ’चे काम विस्तारणे गरजेचे वाटत होते. त्या दृष्टीने आम्ही पावले उचलली. नवीन मित्र जोडले, त्यांचा विश्वास संपादन केला आणि वैचारिक बैठकांचा सिलसिला सुरू केला. पुण्यात वृत्तपत्रांचा मोठा वाचकवर्ग आहे. विशेषतः दैनिक ‘सम्राट’ला येथे मोठा प्रतिसाद मिळतो. सकाळी वृत्तपत्रांच्या स्टॉलवरून ‘सम्राट’ची प्रत लगेच संपते. अशा जागरूक वातावरणात आपल्या ‘बहुजन सौरभ’चा प्रभाव निर्माण होईल का, असा प्रश्न मनात यायचा.



विलास गजभिये
मो. 9421588901

परंतु, मी स्वतः त्यात लेखन करत असल्यामुळे आणि चळवळीवर निष्ठा असल्याने प्रयत्न सोडायचे नाहीत, असा दृढ निर्धार केला. ‘बातमी कशी लिहावी’ कार्यशाळेचे नियोजन याच प्रयत्नांचा एक भाग म्हणून ७ जून २०२६ रोजी पुण्यात ‘बातमी कशी लिहावी’ या विषयावर एक दिवसीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली. पुण्यात वृत्तपत्र वाचन ही एक लोकचळवळ आहे. विविध संस्था आणि संघटनांची मुखपत्रे येथे नियमित वाचली जातात. दैनिक वृत्तपत्र खरेदी करून वाचणाऱ्यांची संख्या मोठी आहे. “सकाळी वृत्तपत्र मिळाले नाही तर दिवस कंटाळवाणा जातो,” अशा प्रतिक्रिया येथील वाचकांच्या निष्ठेची साक्ष देतात. वृत्तपत्र हे समाजाचा आरसा असते. समाजातील घटना, प्रश्न, समस्या, उपक्रम, आंदोलने, राजकीय घडामोडी, शिक्षण, आरोग्य, शेती, उद्योग, कला आणि संस्कृती यांची अचूक माहिती वाचकांपर्यंत पोहोचवण्याचे काम पत्रकार करतात. ही माहिती प्रभावी आणि विश्वासार्ह पद्धतीने मांडण्यासाठी बातमी लेखनाची कला आत्मसात असणे आवश्यक आहे. कार्यशाळेसाठी मी पूर्ण पूर्वतयारी केली होती. आवश्यक टिपणे तयार केली आणि सहभागींकडून येणाऱ्या संभाव्य प्रश्नांचा अभ्यास केला. हा उपक्रम उच्चशिक्षित आणि विविध क्षेत्रांत कार्यरत असलेल्या उत्साही सहभागींसमोर पार पडला. बातमी लेखनाचे मूलभूत नियम कार्यशाळेत बातमी लेखनाचे विविध पैलू सोप्या भाषेत समजावून सांगण्यात आले. एखादी घटना नुकतीच घडली असेल किंवा घडणार असेल आणि तिची माहिती समाजासाठी महत्त्वाची असेल, तर त्या घटनेची वस्तुनिष्ठ मांडणी म्हणजे बातमी. बातमीत कल्पना, अफवा किंवा वैयक्तिक मताला स्थान नसते. बातमी पूर्ण होण्यासाठी कोणी, काय, कुठे, केव्हा, का आणि कसे म्हणजेच ‘5W + 1H’ या सहा प्रश्नांची उत्तरे मिळणे आवश्यक आहे. बातमीचा मथळा छोटा, स्पष्ट आणि बातमीचा गाभा सांगणारा असावा. पहिल्या परिच्छेदात म्हणजे ‘लीड’मध्ये बातमीचा सर्वात महत्त्वाचा भाग असावा. त्यानंतर कमी महत्त्वाची माहिती देत ‘उलटा पिरॅमिड’ पद्धतीने बातमी लिहावी. त्यामुळे संपादकाला जागेच्या अभावी बातमी शेवटून कमी करणे सोपे जाते. पत्रकारासाठी विश्वासार्हता हीच खरी पुंजी आहे. नावे, पदे, तारीख, आकडेवारी आणि वक्तव्यांची पडताळणी केल्याशिवाय बातमी देऊ नये. विशेषतः अपघात, गुन्हे, आर्थिक व्यवहार किंवा संवेदनशील विषयांत अधिक काळजी घ्यावी. बातमीत पत्रकाराने स्वतःचे मत मांडू नये. भाषा सहज आणि समजण्यास सोपी असावी. व्यक्तींची नावे, स्पेलिंग आणि पदे अचूक असावीत. ऐतिहासिक संदर्भांचा उल्लेख करताना पूर्ण अचूकता बाळगली पाहिजे. बातमीसोबत प्रसंगाशी संबंधित फोटो आणि स्पष्ट कॅप्शन दिल्यास बातमीचा प्रभाव वाढतो. बातमी पूर्ण झाल्यानंतर नावे, आकडेवारी आणि व्याकरण तपासण्यासाठी पुनर्तपासणी करणे अत्यंत आवश्यक आहे. सामाजिक जबाबदारी आणि मिळालेला विश्वास पत्रकार हा समाजाचा माहितीवाहक असतो. त्याने सत्य, अचूकता आणि समतोल यांना प्राधान्य दिले पाहिजे. कोणाच्याही दबावाखाली न येता सर्वसामान्यांचे प्रश्न मांडणे हेच पत्रकारितेचे खरे कर्तव्य आहे. पुण्यातील हा प्रयोग अत्यंत यशस्वी आणि प्रेरणादायी ठरला. दैनिक ‘बहुजन सौरभ’चा विचार पुण्यात पोहोचवण्यासाठी सुरू केलेल्या या उपक्रमाला उपस्थितांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. कार्यशाळेत सहभागी झालेले माजी उच्च बँक अधिकारी श्री. रमेश उंदीरवाडे यांनी दैनिक ‘बहुजन सौरभ’ला सहकार्य म्हणून पाच हजार रुपयांचा धनादेश माझ्याकडे सुपूर्द केला. ही रक्कम केवळ आर्थिक मदत नसून, ‘बहुजन सौरभ’च्या विचारांवर आणि कार्यावर पुणेकरांनी दाखवलेल्या विश्वासाचे प्रतिक आहे. हा पाठिंबा आम्हाला भविष्यात अधिक जोमाने काम करण्याची ऊर्जा देणारा ठरला आहे. ●●

# अण्णा... शाहीस्नान... आणि शिवाजी ठाकरे



मैं भी अण्णा' टोपीला कधीकाळी फारच आदर मिळत होता. अण्णा हजारे उपोषणाला बसले काय आणि जो तो स्वतःला अण्णा समजू लागला पण अण्णा हजारे यांच्या आंदोलनाने एका सत्तेला सुरुंग लावून अनेक केजरीवाल निर्माण केले आणि अण्णा तेव्हा पासून जे गप्प बसले की पुन्हा अण्णा आंदोलन होऊ शकले नाही. त्यानंतर आलेल्या अभिजित दिपकेनेही विद्यार्थ्यांच्या प्रश्नासाठी दिल्लीत जंतर मंतर वर केलेल्या आंदोलनाने देशभरात पोचवले आणि आंदोलनाची मोठी चर्चा होऊन अनेकांच्या मनाला हदरवून सोडले. ठिकठिकाणी त्याला प्रतिसादही मिळाला. त्यासाठी त्याला छोटा अण्णा ही म्हटले गेले. नाही तसे 1998 ला जिल्ह्यातील सर्व पत्रकारांना घेऊन तत्कालीन जिल्हा माहिती अधिकारी शिवाजी मानकर यांचेबरोबर अण्णा हजारे यांच्या राळेगण सिद्धीला भेट देण्याचा योग आला. राळेगन सिद्धी, रेहकुरी पक्षी अभयारण्य, पंढरपूर विठ्ठल दर्शन आणि तेथील वृद्धाश्रम, चास



शफीक शेख
मो. 9420588366

कमान आणि सज्जन गड, उजनी प्रकल्पाची पाहणी असा अभ्यास दौरा होता. मात्र अण्णा लक्षात राहिले ते दिल्ली आंदोलनाने. अण्णा हजारे यांनी भ्रष्टाचाराविरोधात केलेल्या आरोपांमुळे महाराष्ट्रातील तब्बल पाच मंत्र्यांना घरी बसावे लागले. त्यांचा फटका मलाही बसला तो वेगळाच. राज्य सरकारच्या महाराष्ट्र कामगार मंडळात जनसंपर्क अधिकारी पदासाठी जाहिरात होती. त्यावेळी कामगार मंत्री म्हणून नबाब मलिक यांचेकडे कॅबिनेट तर हेमंत देशमुख यांचेकडे राज्यमंत्री पदाचा पदभार होता. नबाब मलिक यांचे मार्फत जनसपंर्क अधिकारी पदाची संधी मिळत होती. मात्र अण्णा हजारे यांनी केलेल्या भ्रष्टाचाराच्या आरोपांमुळे सुरेश जैन, नवाब मलिक आदी पाच मंत्र्यांना घरी बसावे लागले आणि त्यांची चौकशी सुरु झाली. यात आमचे जनसंपर्क अधिकारी होण्याचे स्वप्न पुन्हा हवेतच विरले - अण्णा हजारे नावाचे वादळ सुरु असल्याने त्यांची भेट घेणाऱ्यांची संख्याही झपाट्याने वाढली. सटाणा महाविद्यालयात शिकणारा शिवाजी ठाकरे नावाचा वर्गमित्र ही तितकाच भारावला होता. अण्णा हजारे यांच्या भ्रष्टाचार विरोधी आंदोलनाला बळ मिळावे म्हणून त्यांना शाहीस्नान घालण्यासाठी रथ घेऊन शिवाजी ठाकरे आणि सौ. कल्पना ठाकरे हे दाम्पत्य अनवाणी पावलांनी राळेगन सिद्धी येथे पायी निघाले होते. रथाच्या दोन्ही बाजूला लिहिलेल्या कविताच्या ओळी लोकांचे लक्ष वेधून घेत होत्या. त्र्यंबकेश्वरला खळेश्वर महाराज यांचे दर्शन आशीर्वाद घेऊन निघालेली त्यांची अनवानी पदयात्रा 18 सप्टेंबर 2011 रोजी रविवारी मालेगावात पोचली. अठरा दिवसांचा प्रवास करूनही ठाकरे दाम्पत्यात तितकाच उत्साह टिकून होता. रथ आल्यावर वर्गमित्र शिवाजी आणि कल्पना ठाकरे, चिरंजीव पियुष यांची भेट घेतली. त्यांना आमच्या कार्यालयात बोलवून सर्वांची ओळख करून दिली आणि सविस्तर माहिती घेऊन वृत्त घेतले. त्याचे फिचर केले. गावगावचे तीर्थ घेऊन गाडीवर ठेवलेल्या कलशात जमा करून त्यांनी हजारे यांना शाहिस्नान घातले होते. मंत्री दादा भुसे यांचे जनसंपर्क कार्यालय मी काम करीत असलेल्या दैनिकांच्या खालीच असल्याने त्यांची भुसे यांचेशी भेट घालून दिली. भुसे यांनीही ठाकरे दाम्पत्याचा यथोचित सत्कार करून आस्थेने चौकशी केली. आपल्या भागातला तरुण हजारे यांचे भेटीसाठी घेऊन जात असलेल्या रथाची पाहणी करून त्यांना निरोप दिला. सविस्तर वृत्तही छायाचित्रासह प्रसिद्ध करून मैत्रीच्या बंधनातून काहीसे मुक्त होण्याचा प्रयत्न केला. आज अण्णा आंदोलने करताना दिसत नाहीत. त्यामुळे त्यांच्यावर टीका ही होते. पण काही काळ का असेना अण्णा हजारे यांनी भ्रष्टाचार विरोधात मोहीम राबवून त्यावेळी तरुणांना घातलेली भुरळ आजही लोक विसरू शकलेले नाहीत, हे मात्र तितकेच खरे.●●

**अण्णा हजारे यांनी भ्रष्टाचारा विरोधात केलेल्या आरोपांमुळे महाराष्ट्रातील तब्बल पाच मंत्र्यांना घरी बसावे लागले. त्यांचा फटका मलाही बसला तो वेगळाच राज्य सरकारच्या महाराष्ट्र कामगार मंडळात जनसंपर्क अधिकारी पदासाठी जाहिरात होती त्यावेळी कामगार मंत्री म्हणून नबाब मलिक यांचेकडे कॅबिनेट तर हेमंत देशमुख यांचेकडे राज्यमंत्री पदाचा पदभार होता नबाब मलिक यांचे मार्फत जनसंपर्क अधिकारी पदाची संधी मिळत होती मात्र अण्णा हजारे यांनी केलेल्या भ्रष्टाचाराच्या आरोपांमुळे सुरेश जैन, नवाब मलिक आदी पाच मंत्र्यांना घरी बसावे लागले आणि त्यांची चौकशी सुरु झाली यात आमचे जनसंपर्क अधिकारी होण्याचे स्वप्न पुन्हा हवेतच विरले.**

# माझ्यासाठी बुद्ध शांतीचे प्रतिक

## ऋता झुनझुनवाला

**दिल्लीच्या प्रसिद्ध चित्रकार आणि कवयित्री ऋता झुनझुनवाला यांनी 'संन्याशी' सारख्या प्रदर्शनातून बुद्धांचा आध्यात्मिक प्रवास आणि विचारधन अतिशय सुंदरपणे उलगडले आहेत. बुद्ध कलाकृतीने राष्ट्रपती भवनाच्या सौंदर्यात भर टाकणाऱ्या ऋता झुनझुनवाला यांचा आज, २३ ऑगस्ट रोजी ७०व्या वर्षात पदार्पण करीत आहेत त्यानिमित्ताने...**



भारताच्या प्रसिद्ध महिला चित्रकार आणि कवयित्री दिल्लीच्या आदरणीय ऋता झुनझुनवाला यांचा जन्म २३ ऑगस्ट १९५६ रोजी कोलकता येथे झाला. त्यांच्या नावाचा अर्थ अंतिम सत्य आणि प्रामाणिकपणा असा होतो. मानवी आचरणात 'ऋत' पाळणे म्हणजे सत्य, सदाचार आणि योग्य मार्गावर चालणे होय. याच सत्यवचनाने ऋताजींचे व्यक्तिमत्त्व बहरत गेले. शालेय जीवनात इयत्ता आठवीत शिकत असताना १९६९ साली त्यांना 'सोवियत लँड नेहरू पुरस्कार' मिळाला. हा त्यांच्या आयुष्यातील सर्वात मोठा परमोच्च आनंदाचा क्षण होता. तेव्हापासून त्यांना चित्रकलेचा छंद जडला. विज्ञानशाखेच्या हुशार विद्यार्थिनी असलेल्या ऋताजींनी १९७७ साली कोलकता विद्यापीठातून विशेष प्रावीण्यासह पदवी प्राप्त केली. भावी आयुष्यात चित्रकलेचा मार्ग पत्करला. सप्तरंगी कुंचल्यातून गत ४० वर्षांपासून समाजजीवन, भारतीय संस्कृती, बुद्ध जीवनदर्शन आणि इतर थोर महापुरुषांचे सुंदर चित्रे त्यांनी चितारली आहेत.

ऋताजींनी कोणत्याही ऑर्ट कॉलेजात शिक्षण घेतले नाही. कोलकाता आर्ट कॉलेजचे प्रोफेसर अशेष मित्रा, चित्रा मजुमदार आणि दिल्ली आर्ट कॉलेजचे प्रोफेसर बिमल दासगुप्ताकडून त्यांनी चित्रकलेचे धडे घेतले. अनेक ग्रुप शो आणि सोलोचे देशभरात आयोजन केले. त्यांचा पहिला ग्रुप शो १९८० साली 'अ‍ॅकेडमी ऑफ फाईन आर्ट' कोलकाता येथे तर सोलोचा पहिला प्रयोग १९८१ साली 'त्रिवेणी कला संगम' नवी दिल्लीला झाला. त्यांचे कुटुंब क्रांतिकारक आणि अपारंपरिक विचारांचे असल्यामुळे त्यांनी नेहमीच स्वतंत्र विचारांना प्रोत्साहन दिले. या महान कार्यात त्यांना पतीसोबतच घरच्या लोकांनी प्रोत्साहन दिले. अशा या कलाप्रेमी, कला तपस्विनी ऋता झुनझुनवाला यांच्यावर बौद्ध तत्त्वज्ञानाचा प्रचंड प्रभाव आहे. 'माझ्यासाठी बुद्ध शांतीचे प्रतिक आहेत' असे त्या मोठ्या अभिमानाने म्हणतात. त्याचीच परिणती म्हणजे बुद्धांच्या जीवन दर्शनावर त्यांनी



मिलिंद मानकर
मो. 8177866397

जवळपास २५ (झेन विचार) चित्रे साकारली. त्यांची बुद्धचित्रे जीवनातील शांती, संतुलन आणि आंतरिक चेतना दर्शवतात. ज्यातून ध्यान आणि बौद्ध तत्त्वज्ञान प्रतिबिंबित होते. २००४ साली 'संन्याशी' प्रदर्शनातून त्यांनी बुद्धांचा आध्यात्मिक प्रवास आणि विचारधन अतिशय सुंदरपणे उलगडले आहेत. 'परित्याग' या कवितेत त्या म्हणतात, ‘सब कुछ पाकर भी छोड़ा अपने पथ को, कुछ ऐसे मोड़ा मुकुट गिरा तो ज्ञान मिला, मौन में जीवन का गान मिला। त्याग न धन का, न संसार का - त्याग बस अपने अहंकार का छोड़ा आसक्ति, छोड़ा अहम की पूर्ति परित्याग की बने वह सच्ची प्रतिमूर्ति!’ वृक्षांच्या सावलीत वास्तव्य, जमिनीवर शयन, मृगचर्माचे परिधान आणि सर्व ऐहिक वस्तूंचा त्याग अशा वैराग्यामुळे कोणाला बरे आनंद मिळणार नाही? सिद्धार्थ गौतम असे एक महामानव आहेत जे अस्तित्वाचे उच्च ध्येय साध्य करण्यासाठी स्वतःला पूर्णपणे समर्पित करतात आणि या प्रवासात सामान्य माणसाला प्रिय असलेल्या सर्व गोष्टींचा जसे की राज्य, संपत्ती, माता-पिता, पत्नी आणि पुत्राचा त्याग करतात. अत्यंत निष्ठेने आपल्या या उदात्त शोधाचा पाठपुरावा करीत तो 'बुद्ध' बनतो म्हणजेच 'जागृत' पुरुष. प्राचीन ऋषीमुनींचे असे म्हणणे आहे की, अशा व्यक्तीला इतकी अगाध आणि उत्कट शांती प्राप्त होते की त्याचे डोळे, त्याच्या हालचाली आणि त्याचे संपूर्ण अस्तित्वच शांततेचा अनुभव घडवतात. त्यांच्या सान्निध्यात येणारी कोणतीही व्यक्ती त्या प्रभावापासून अलिप्त राहू शकत नाही. ऋताजी म्हणतात, माझ्या नजरेत 'बुद्ध' म्हणजे ती शांतीच आहे आणि चित्रांच्या या मालिकेतून मी तीच शांती साकारण्याचा प्रयत्न केला आहे.

बुद्धांचे सर्वोत्तम विचारधन धार्मिक विधींपेक्षाही त्यांना अधिक जवळचे वाटतात. बुद्धांना त्या शांती, ध्यान आणि आंतरिक संतुलनाचे प्रतिक मानतात. बुद्धांविषयीचे त्यांचे विचार त्यांच्या कला आणि तत्त्वज्ञानात प्रामुख्याने दिसून येतात. त्या स्पष्टपणे नमूद करतात की, 'जेव्हा त्यांचे मन अशांत असते, तेव्हा लक्ष ज्ञानप्राप्तीकडे वळते. बुद्धांची शांत आणि ध्यानस्थ मुद्रा त्यांचे मन वैश्विक स्पंदनांनी आणि शांतीने भरून टाकते.' त्यांच्या मते, 'बुद्धांचे जीवन केवळ एका मूर्तीपुरते मर्यादित नाही, तर ते सांसारिक आसक्तींच्या पलीकडे जाऊन शाश्वत सत्य आणि निर्वाणाचा शोध घेते.' बुद्धांसोबतच कमळालाही त्यांच्या कलाप्रवासात एक गहन महत्त्व आहे, ज्याला त्या आध्यात्मिक शुद्धता आणि एकांताचे प्रतिक मानतात. भारताचे माजी राष्ट्रपती एपीजे अब्दुल कलाम ऋताजींच्या कलाकृतीने प्रभावित झाले होते. ऋताजी सांगतात, 'कलाम यांनी राष्ट्रपती भवनासाठी माझ्या बुद्ध कलाकृतीची २००४ साली मागणी केली होती. मी त्यांना बुद्धांचे चित्र सस्नेह भेट दिले. त्यांनी किंमत विचारली असूनही ते मी विकले नाही.' अखिल विश्वाला शांती, करुणा अन् मैत्रीचा संदेश देणाऱ्या तथागत बुद्धांचे ते चित्र आजही राष्ट्रपती भवनात डौलाने उभे आहे. राष्ट्रपती भवनाला भेट देणाऱ्यांना ते प्रेरणा देत आहे. बुद्धांव्यतिरिक्त त्यांनी बनारस, लडाख आणि निसर्ग यांसारख्या विषयांवरही उत्कृष्ट मालिका तयार केल्या आहेत. जवळपास ४० कविता आणि चित्रकलेचा अद्वितीय संगम त्यांनी 'भीगी लकीरें' या प्रदर्शनातून मांडला. त्यांची कला प्रदर्शनी भारतात आणि परदेशात, जसे की दिल्लीतील 'इंडिया हॅबिटॅट सेंटर' आणि इतर आंतरराष्ट्रीय कार्यक्रमांमध्ये सादर केली जाते. सतत दीर्घोद्योग आणि अखंड कला साधक असलेल्या ऋता झुनझुनवाला यांच्या कलाकृतींना राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर अनेक मान-सन्मान, पुरस्कार, प्रशस्तीपत्रे मिळाली आहेत. ज्यात राष्ट्रपती भवनात विशेष सन्मानित झालेल्या बुद्ध कलाकृतीचाही समावेश आहे. ग्रँड प्रिक्स इंटरनॅशनल डी पेनच्युअर डी डियुली फ्रान्स' (१९८४), ग्रँड प्रेमियो इंटरनॅशनल डी पीटुरा रोम इटली (१९८५), रोटरी क्लब नवी दिल्ली (१९९७), भिक्खुराम जैन फाउंडेशन अवार्ड (२०१०), संगीत श्यामला अवार्ड (२०१३) आणि अपराजिता अवार्ड (२०१८) आदि पुरस्कारांचा समावेश आहे. प्रेमळ, सदाचारी, सौजन्यशील अन् बुद्धप्रेमी ऋता झुनझुनवाला पती रवी आणि मुलाबाळांसह सुखी समाधानाने जीवन जगत आहेत. मात्र उतारवयातही त्यांचे मन कलासाधनेत गुंतले असून एकजीव झाले आहे. ७०व्या वाढदिवसानिमित्त ऋताजींना सुदृढ, निरोगी दीर्घायुष्यासाठी आभाळभर शुभेच्छा.●●

# कथा




आज गुरुवार होता. मंगळवारपासून गर्भार मंजुळा खुटीला बांधलेल्या गाईसारखी विव्हळत होती. दोन दिवस उलटले तरी प्रसूतीच्या वेदनेपासून तिची सुटका झाली नव्हती. चुलीवर गरम पाण्याला उकळी आली होती. निखारे समोर ओढून त्यावर काळ्या चहाचा जर्मनचा गंज ठेवला होता. तिचा नवरा मात्र हताशपणे इकडे-तिकडे फिरत होता. आजच्यासारखे त्याकाळी दवाखाने सहज उपलब्ध नव्हते. असतील तर ते शहरी भागात. तिथे जाण्यासाठी ना दुचाकी होती ना चार चाकी. तिच्या नवऱ्याने अंगणात खाचर जुंपायला घेतले, तेव्हा सुईण म्हणाली, “अजून वेळ आहे! कोरडे बाळंतपण आहे हा! अशा बाळंतपणांना वेळ लागतो. दोन-दोन, तीन-तीन दिवस लागतात.” मंजुळा वेदनेने विव्हळत होती. जुन्या कपड्यांनी तिचे अंग झाकले होते. वेदनेने तडपत-तडपत तिच्या केसांचा गुंता झाला होता. विव्हळताना केस वारंवार डोळ्यांवर येत होते. उशाशी बसलेली तिची मामी तिच्या डोक्यावरून हात फिरवत म्हणाली, “थांब गं बाई... होशील आई... सहन कर.” बुधवारची रात्र सरली. मध्यरात्रीचा बाराचा ठोका पडला. सर्वत्र अंधार आणि शांतता होती. अंगणात जुंपलेले खाचर तसेच उभे होते. दोन दिवसांच्या जागरणाने थकलेला नवरा आणि सासरा झोपी गेले होते. सुईण आणि मामीही शांत होत्या. मामीला आता काही खरे नाही, असे वाटू लागले होते. मंजुळा मात्र खाटेवर कण्हत होती. कळ आली की ती जोरात ओरडायची, “अव माय व!” थोड्या वेळाने पुन्हा शांतता. तिचे उठणे, बसणे आणि पुन्हा उठणे सुरूच होते. मध्यरात्रीनंतर तिला वारंवार शौचाला लागले. त्या काळात शौचालये नव्हती. रात्री बाहेर जाणेही अवघड होते. मामीने रॉकेलच्या दिव्याच्या प्रकाशात सुईणीला सोबत घेतले आणि मंजुळाला कसाबसा आधार देत बाहेर नेले. तिला जमिनीवर पायसुद्धा ठेवता येत नव्हता. वेदना सहन करायच्या की वाढलेल्या पोटाचे वजन? नियतीची जीवघेणी यातना सुरूच होती. कशाबशा त्या दोघींनी तिला मागच्या वाडीत नेले. बराच वेळ ती तिथेच बसून राहिली. मामी आणि सुईणीला भीती वाटू लागली.“इथेच तर हिचं बाळंतपण होणार नाही ना?” पण थोड्या वेळाने त्या तिला पुन्हा घरातील खाटेवर घेऊन आल्या. तिच्या अंगात आता ताकद उरली नव्हती. मात्र बाळाला येण्याची जागा कोरडी राहिली नव्हती. ओलावा निर्माण झाला होता. सुईणीने ते ओळखले आणि मामीला म्हणाली, “आता होतंय वाटतं बाई बाळंतपण!” मामी म्हणाली, “पण इच्यात एक बी ताकद नाही. मले तर भीती वाटून राहिली.” मंजुळा वेदनेतही म्हणाली, “मामी, मले काय बी नाही होत. लावीन मी ताकद.” गर्भ बाहेर येण्याचा प्रयत्न आणि त्या प्रयत्नामुळे होणाऱ्या तीव्र वेदनांनी ती अगतिक झाली होती. शेवटी वेदनेची तीव्रता पराकोटीला पोहोचली. मंजुळा जोरात किंकाळली. तिच्या आवाजाने सुईण आणि मामीच्या मनात आशा निर्माण झाली. झोपलेला नवरा आणि सासराही जागा झाला. सुईण पोटाच्या भोवती स्वतःची ताकद लावू लागली. मंजुळाने अंगातील सारी ताकद एकवटली. जणू बाळाचा जीव वाचवण्यासाठी तिला आतूनच बळ मिळाले होते. अखेर तिला जोराची कळ आली आणि तिने मोठी किंकाळी फोडली. क्षणभरात बाळाच्या रडण्याचा आवाज आला. नऊ महिन्यांपासून पोटात असलेला जीव अखेर जगात आला होता. मंजुळा शांत झाली. तीन दिवसांच्या असह्य वेदनेतून तिची सुटका झाली होती. तिचे शरीर थकून-भागून निश्चल झाले होते. मामीने निखाऱ्यावरचा काळा चहा स्टीलच्या ग्लासात ओतला. ग्लासाला कापड गुंडाळून ती मंजुळाजवळ आली.“मंजुळे! खूप त्रास भोगलास गं बाई. अशक्तपणाही आलाय. घे, हा काळा चहा पी. अंगात ताकद येईल.” मंजुळेने हळुवार डोळे उघडले आणि कसाबसा आवाज काढला, “मामी! माझं बाळ कसं आहे?” मामी म्हणाली, “मंजुळे, पोरगा झाला! धर, पहिले तू पी. थोडी अंगात ताकद येईल.” ती घोट-घोट करून तिला चहा पाजू लागली. सुईणीने जुन्या कपड्यात लपेटलेले नवजात बाळ तिच्यासमोर आणले. तीन दिवसांची असह्य वेदना बाळाला पाहताच मंजुळा एका क्षणात विसरली. तिच्या थकलेल्या डोळ्यांत, निस्तेज चेहऱ्यावर आणि सुकलेल्या ओठांवर हसू उमटले. नवरा आणि सासराही आनंदित झाले. नवीन जीवाच्या जन्मासाठी प्रसूतीच्या असह्य वेदना सहन करून एका आईने नव्या जीवनाला जगात आणले होते. आईसाठी त्या वेदना अत्यंत पीडादायक असतात; पण बाळाचा जन्म होताच त्या वेदनेचा तिला विसर पडतो. ही वेदना एक स्त्रीच सांगू शकते आणि एक स्त्रीच ती समजू शकते. या वेदनेची जाणीव करून देण्याचा उद्देश एवढाच की, एक स्त्री नऊ महिने आपल्या गर्भात बाळाला वाढवते. प्रसूतीच्या असह्य वेदना सहन करून ती एका नव्या मानवी जीवनाला जन्म देते. तिच्यामुळेच सृष्टीची निर्मिती पुढे चालत राहते. मग हल्ली याच स्त्रीवर अन्याय-अत्याचार करणाऱ्या पुरुषांना तिची वेदना कधीच दिसत नाही का? लहान मुलींवर आणि स्त्रियांवर लैंगिक अत्याचार करताना त्यांना तिच्या वेदनेची जाणीव होत नाही का? ज्या स्त्रीच्या गर्भातून तो जन्म घेतो, ज्या



प्रीती तिरपुडे
7972119871

स्तनातून आईचे दूध पितो, त्याच स्त्रीकडे तो भोगवस्तू म्हणून का पाहतो? स्त्री ही केवळ भोगाची वस्तू नाही. ती जीवनाची निर्माती आहे. तिचा आदर आणि सन्मान केला, तर समाजातील बलात्कार, अन्याय आणि अत्याचार कमी करण्याच्या दिशेने आपण महत्त्वाचे पाऊल टाकू शकतो. समाजात या विघातक प्रवृत्तीची वाढ होत आहे. तिचा नाश करणे ही आजच्या समाजाची अत्यंत गरज आहे. एका स्त्रीच्या वेदनेची जाणीव होणे म्हणजे केवळ स्त्रीचा सन्मान करणे नव्हे; तर माणूस म्हणून आपल्या माणुसकीचा सन्मान करणे होय.●●

# मानवकेंद्री जाणिवांचा प्रवास

## ‘किनारे सरकत आहेत’

*गझलकार : डॉ. नंदकिशोर दामोधरे*
*प्रस्तावना : प्रमोद वाळके ‘युगंधर’*
*परिचय सुदाम सोनुले*




मराठी साहित्य समृद्ध होण्यामागे विविध वैचारिक प्रवाह आणि सामाजिक चळवळींचा मोठा वाटा राहिला आहे. वंचित, शोषित आणि उपेक्षित घटकांची जाणीव व वास्तविकता साहित्याने मांडली तेव्हा सामाजिक न्याय, समता आणि मानवी मूल्यांसाठी अक्षरांची चळवळ उभी राहिली. या प्रवाहातून पुरोगामी साहित्य मराठी साहित्याच्या केंद्रस्थानी आले आणि त्यात आंबेडकरी साहित्याचा विशेष प्रभाव राहिला. आंबेडकरी साहित्य हे सामाजिक न्याय, समता आणि मानवाधिकार या मूल्यांची दृढनिश्चिती करणारे साहित्य आहे. नाटक, कथा, कादंबरी, आत्मचरित्र, कविता याप्रमाणेच आंबेडकरी गझलेचाही महत्त्वाचा वाटा आहे. आंबेडकरी गझल म्हटले की आदरणीय वामनदादा कर्डक यांची आठवण होते. त्यांच्या लेखणीने घडविलेल्या परंपरेचे प्रतिनिधित्व करणाऱ्या अनेक लेखण्या आजही कार्यरत आहेत. डॉ. नंदकिशोर दामोधरे यांचा ‘किनारे सरकत आहेत’ हा गझलसंग्रह याच सम्यक आणि मानवतावादी भूमिकेवर ठाम राहतो. हा संग्रह वामनदादा कर्डक आणि निष्ठावान आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्त्यांना समर्पित आहे. पशुवैद्यक, पँथर कार्यकर्ता, लघुचित्रपट निर्माता, संपादक आणि गझलकार अशा विविध भूमिका पार पाडणाऱ्या डॉ. दामोधरे यांचा प्रवास ऊर्जादायी आहे. सामाजिक जाणिवेतून केलेले त्यांचे कार्य त्यांच्या लेखणीला व्यापक अनुभव देते. फुले-आंबेडकरी विचारधारा जपत त्यांची लेखणी समूहकेंद्री होते आणि समग्र मानवकल्याण हा तिचा प्रमुख हेतू ठरतो. त्यांच्या गझलांमध्ये मानवता हे मौलिक सौंदर्यतत्त्व जाणवते. जात, धर्म, पंथ आणि लिंग यापलीकडे जाऊन माणूसपण स्वीकारण्याचे आवाहन त्या करतात, “ना खुदावर, प्रेषितावर, ईश्वरावर तू भरोसा ठेव, केवळ माणसावर.” तसेच भारतीयत्व, संविधाननिष्ठा आणि समानतेचा संदेश देताना ते म्हणतात, “मी भारतीय आहे इतकेच भान ठेवा. माझ्या शवाबरोबर हे संविधान ठेवा. माणूस धर्म व्हावा. प्रत्येक माणसाचा देशाप्रती हमेशा सच्चे इमान ठेवा”. मानवकल्याणाचा हाच विचार बुद्धांच्या इहवादी आचारधर्माशी जोडलेला आहे. बुद्धांच्या धम्मातील नैतिकता, करुणा, बंधुता आणि सम्यक आचरण यांचे महत्त्व डॉ. दामोधरे अधोरेखित करतात. वारकरी परंपरेतील नैतिकता आणि सम्यक आचरण यांच्यातील नाते ते सुंदरपणे मांडतात, “चंदनाचे पाय त्याचे चंदनाचे हात आहे. गौतमाचे रूप अवघे पांडुरंगा आत आहे. पंढरीची ज्ञानवारी चालता हे धम्मचारी संत साधू, त्या अभंगी बुद्धवाणी गात आहे” बुद्धांच्या विचारांबरोबर आंबेडकरी विचारांची धारही या साहित्यकृतीत जपली आहे. अन्याय आणि अत्याचाराविरोधातील बंड आणि विद्रोह हा अकारण नसून मानवमुक्तीची आकांक्षा त्यामागे आहे. म्हणूनच कवी म्हणतो, “सोसून घाव आम्ही, सूर्याकडे निघालो, केला उठाव आम्ही, सूर्याकडे निघालो” तथागतांच्या ‘अनित्यवाद’ या संकल्पनेचाही सुंदर आविष्कार या गझलांमध्ये दिसतो. निसर्ग आणि मानवी जीवनातील बदल, अस्थिरता आणि परिवर्तन स्वीकारताना आशावादाची भूमिका पुढे येते, “निघून जाईल हा उन्हाळा, कळ्या फुलांचा बहर उद्याचे कुणीच नाही कसे म्हणावे” समकालीन वास्तवाचे निरीक्षण करून जातीय विषमता, आर्थिक अन्याय, आरक्षण, रोजगार आणि सत्तेतील विसंगती यांसारखे ज्वलंत प्रश्न डॉ. दामोधरे मांडतात. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दाखवून दिलेल्या जातीय व्यवस्थेच्या वास्तवाचे पडसाद त्यांच्या गझलांमध्ये उमटतात, “अर्धपोटी माणसांना रोज छळते ही व्यवस्था भाकरीला चोरणारा काल होता, आज आहे.” आरक्षणाबाबतचे गैरसमज दूर करताना समानतेचा विचार ते स्पष्ट करतात, “सवलत म्हणजे आर्थिक लयलुट नसते. मित्रा, सवलत म्हणजे समानतेची बढती आहे” तसेच शिक्षण आणि भुकेच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष करणाऱ्या व्यवस्थेवरही ते प्रश्न उपस्थित करतात. उपेक्षितांच्या वेदना आणि सामाजिक विषमता त्यांच्या लेखणीतून प्रभावीपणे व्यक्त होते. साहित्य आणि चळवळींचा अनुबंध या संग्रहात स्पष्ट दिसतो. लिहिणाऱ्या हातांनी अन्याय-अत्याचाराविरुद्ध लढले पाहिजे, ही भूमिका पँथर चळवळीच्या अनुभवातून आलेली आहे. डॉ. दामोधरे स्वतः पँथर कार्यकर्ते असल्याने त्यांच्या साहित्यामागे प्रत्यक्ष चळवळीचा अनुभव आहे, “चळवळीचा शब्द मीही पाळतो देह माझा मी उन्हावर जाळतो.” डॉ. दामोधरे हे ग्रामीण जीवनाशी आणि शेतीशी जोडलेले असल्याने शेतकऱ्यांच्या प्रश्नांचे वास्तवही त्यांच्या गझलांमध्ये प्रभावीपणे येते. “पाहू कसा मजेने गोत्यात, कास्तकारी राहू कसा सुखाने तोट्यात, गुलाम भारताचे नुसतेच स्वप्न हिरवे प्रत्यक्ष संकटाच्या जबड्यात कास्तकारी” ‘किनारे सरकत आहेत’ हा गझलसंग्रह सामान्य माणसाचे जीवन, दुःख, अन्याय, अत्याचार आणि चळवळीचा आवाज बनतो. मानवकल्याण, समता, नैतिकता, तर्क आणि नवमूल्यांची मांडणी हा या संग्रहाचा गाभा आहे. गझलतंत्राच्या दृष्टीनेही या संग्रहाला जाणकारांची दाद मिळाली आहे. प्रमोद वाळके ‘युगंधर’ यांच्या मते, गझला अक्षरगणवृत्त आणि मात्रा वृत्तात असून गझलतंत्रात वेगळे प्रयोगही आढळतात. ‘किनारे सरकत आहेत’ हा संग्रह वाचकाला विचारप्रवण, अंतर्मुख आणि संघर्षासाठी प्रेरित करणारा आहे. आंबेडकरी विचारांची ऊर्जा माणूसपण सिद्ध करण्यासाठी वापरण्याचा संदेश देत तो म्हणतो, “नंदा चला लढू या, झुंजार माणसा समया दाखवू जगाला विझले तुफान नाही” मानवतामूल्ये जपणाऱ्या डॉ. नंदकिशोर दामोधरे यांच्या लेखणीला आणि त्यांच्या पुढील साहित्य प्रवासाला मनःपूर्वक शुभेच्छा.●●

–अमृता अतुल

बहुजन सौरभ
BAHUJAN SAURABHA



# न्यायालयाच्या लिपिक भरती परीक्षेत घोळ झाल्याचा आरोप न्यायासाठी धाव



**नागपूर :** मुंबई उच्च न्यायालय व इतर खंडपीठांच्या लिपिक भरतीसाठी घेण्यात आलेल्या संगणक टंकलेखन परीक्षेत मोठ्या प्रमाणात घोळ झाल्याचा आरोप परीक्षार्थींनी केला आहे. लिपिकांच्या 1,332 जागांसाठी 16 जुलै रोजी, ही परीक्षा घेण्यात आली होती. टंकलेखन परीक्षेला राज्यभरातून 11,305 परीक्षार्थी परीक्षेला बसले होते. यापूर्वी लिपिक भरतीची परीक्षा न्यायालय प्रशासनामार्फत घेण्यात येत होती. परीक्षार्थींना हार्ड कॉपी देऊन त्यातील मजकूर संगणकावर टंकलिखित करावा लागत होता. मात्र, यंदा प्रथमच 'स्क्रीन टू स्क्रीन' पद्धतीने परीक्षा घेण्यात आली. या पद्धतीत स्क्रीनवरील अक्षरांचा आकार लहान असल्याने स्वल्पविराम, अवतरण चिन्ह, विसर्ग यांसारखी चिन्हे स्पष्ट दिसत नसल्याची तक्रार परीक्षार्थींनी केली. त्याशिवाय उतारा टंकलिखित करतांना अक्षरे उशिराने स्क्रीनवर उमटत असल्याने टंकलेखनाच्या गतीवर परिणाम झाला. काही परीक्षा केंद्रांवरील की-बोर्डवर धूळ साचलेली होती, तर अनेक ठिकाणी निकृष्ट दर्जाचे की-बोर्ड असल्याने ते व्यवस्थित कार्यरत नसल्याचा आरोप करण्यात आला. टंकलेखन परीक्षेतील नियमही पाळले गेले नसल्याचा दावा जीसीसी-टीबीसी असोसिएशनचे अध्यक्ष देवेंद्र हेडाऊ यांनी केला. परीक्षेसाठी 40 शब्द प्रतिमिनिट गतीची अट असताना, उताऱ्यातील शब्दांची गणना केल्यास प्रत्यक्ष गती 53.32 शब्द प्रतिमिनिट इतकी होती. भंडारा जिल्ह्यातून परीक्षा दिलेल्या पल्लवी शेंडे म्हणाल्या की, तीन बॅचमध्ये परीक्षा होती. पहिल्या बॅचच्या विद्यार्थ्यांना केंद्रावर 11 ते 11.15 पर्यंत पोहचायचे होते. विद्यार्थी 10 वा.पासून परीक्षा केंद्रावर पोहचले. मात्र नेटवर्कच्या समस्या, तांत्रिक त्रुटी यामुळे 5 वाजता विद्यार्थी केंद्राबाहेर पडले. तर दुसऱ्या बॅचचे विद्यार्थी 6 वाजता केंद्रावर गेले. तर तिसऱ्या बॅचची परीक्षाच झाली नाही. पत्रपरिषदेला उपस्थित देवेंद्र हेडाऊ, सारंग मौंदेकर, तेजस मोटघरे, प्रज्वल ताटे, पल्लवी शेंडे, सायली मसारे, राधा दहाले, प्रियंका काद्रेल, ऐश्वर्या मेश्राम, श्वेता टेंभुर्णे, अजित रडके, रजत सोंडावले आणि संकल्प लांजेवार यांची उपस्थिती होती.

# महासमाधी महास्तूपात बोधीसत्व देंग्यो दाइशि साइच्यो यांची जयंती साजरी



**पवनी :** जापान येथील बौद्ध धर्माच्या तेंदाई शाखेचे संस्थापक बोधीसत्व देंग्यो दाइशि साइच्यो यांची १२५९ वी जयंती सिंदपूरी (रूयाळ) येथील प्रसिद्ध महासमाधी महास्तूपात साजरी करण्यात आली. यावेळी बोधीसत्व देंग्यो दाइशि साइच्यो यांच्या पूर्णाकृती मूर्तीला माल्यार्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी पय्या मेत्ता संघाचे अध्यक्ष संघानुशाषक तथा आंतरराष्ट्रीय धम्मदूत आचार्य भदंत संघरत्न मानके यांनी उपस्थितांना बुद्ध वंदना, धम्म वंदना, संघ वंदना दिली व जापानी पद्धतीने पूजाअर्चा केली. तसेच बोधीसत्व देंग्यो दाइशि साइच्यो यांच्या कार्याची माहिती दिली. यावेळी भदंत धम्म शिखर, ॲड. महेंद्र गोस्वामी, डॉ. सुनील जीवनतारे, आनंद विलास रामटेके, विलास मोटघरे, भीमराव वानखेडे, विलास नितनवरे, घरडे, तुकाराम शेंडे यांच्यासह अनेक उपासक मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते.

# डॉ. बाबासाहेबांच्या विचारावर कार्य केले पाहिजे : केंद्रीय मंत्री रामदास आठवले




**भंडारा :** घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सर्व जाती-धर्माच्या लोकांना एकत्र घेऊन भारतासाठी मजबूत संविधान निर्माण केले. विपुल ग्रंथ संपदा निर्माण केली. माणसाला माणूस म्हणून जगण्याचा हक्क दिला. आजच्या काळात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारावर कार्य केले पाहिजे असे प्रतिपादन केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री डॉ. रामदास आठवले यांनी आज पवनी येथे केले.

पवनी येथील गांधी भवन येथील सभागृहामध्ये आज झालेल्या बर्फातील ज्वाला या साप्ताहिकाच्या अठराव्या वर्धापन दिनानिमित्त ते बोलत होते. यावेळी मुख्य पाहुणे म्हणून आ. डॉ. परिणय फुके प्रमुख उपस्थितीमध्ये भदंत संघरत्न मानके, साप्ताहिक बर्फातील ज्वालाचे संपादक मनोहर मेश्राम यांच्या सह गणमान्य नागरिक उपस्थित होते. सुरुवातीला सामूहिक गीत गायनाचा कार्यक्रम संपन्न झाला. वाही येथील शासकीय विश्रामगृहावर मंत्री महोदयांचे आगमन झाले. यावेळी त्यांच्या स्वागताला आ. परिणय फुके, आ. अविनाश ब्राह्मणकर, सहायक आयुक्त समाज कल्याण आशा कवाडे प्रामुख्याने उपस्थित होते. आपल्या भाषणाची सुरुवात कवितेने करून डॉ. रामदास आठवले यांनी मनोहर मेश्राम यांच्या कार्याचे कौतुक केले. मेश्राम यांनी व्रतस्थ पद्धतीने साप्ताहिक चालवले आणि ते करताना त्यांनी समाजहिताबाबत लिखाण केले. डॉ. बाबासाहेबांच्या विचारांवर चालणारे सच्चे कार्यकर्ते मनोहर मेश्राम असल्याचा उल्लेख डॉ. रामदास आठवले यांनी केला. यावेळी आ. डॉ. परीणय फुके यांनी 17 वर्षापासून अग्रेसर वृत्तपत्र समतेसाठी लढणारे वृत्तपत्र असल्याचे बर्फातील ज्वाला असल्याचे सांगितले, तसेच आताच्या काळात इतकी वृत्तपत्र व्यवसायातील निष्ठा वाखाणण्याजोगी असल्याचे सांगितले. कार्यक्रमाला मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.

## महत्वाचे

### डॉ आंबेडकर जन्मशताब्दी स्मारक व शोध केंद्र एस.एस.डी उभारणार आंदोलन



**नागपूर :** नागपूर महापालिकेच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर जन्मशताब्दी स्मारक शोध केंद्र करिता आमदार निवास येथे नुकतीच बैठक झाली. दलाचे संघटक प्रदीप गायकवाड ,शेखर गायकवाड ,भंते हर्षदीप, प्रशिक आनंद आणि इतर कार्यकर्ता उपस्थित होते. समता सैनिक दलाचे मार्शल नागसेन बडगे यांच्या नेतृत्वात डॉ.बाबासाहेब आंबेडकर जन्मशताब्दी स्मारक झालेच पाहिजे या मागणीसाठी आंदोलन करण्यात येईल त्याच प्रमाणे दिनांक १८ डिसेंबर 2026 ला विधानसभेवर काढण्याचा निर्णय घेण्यात आला.



### मानव कल्याण अभ्यासिकेतर्फे स्वातंत्र्य दिन साजरा

**नागपूर :** मानव कल्याण अभ्यासिका, शताब्दीनगरतर्फे ८० वा स्वातंत्र्य दिन एन.आर.टी. प्रांगणात उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी सुभाषज बोधांटे यांनी महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण केला, तर प्रकाशजी भोतमागे यांनी पुष्पपूजा केली. त्यानंतर ध्वजारोहण करण्यात आले. उपस्थितांनी राष्ट्रगीत गायन करून ध्वजाला मानवंदना दिली. अपेक्षा नागदेवे यांनी संविधानाच्या प्रस्तावनेचे सामूहिक वाचन केले.

यावेळी स्वातंत्र्य दिनाच्या शुभेच्छांसह वैशाली मुन यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यात आल्या. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सुरेशजी खांडेकर यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी उज्वला डोंगरे, माला वाघमारे, योगेश्री खांडेकर, आशा कोचे, वैशाली वाळके, बबीता पारखंडे, कविता रामटेके यांच्यासह अनेकांनी सहकार्य केले.



### बोधिसत्व सोसायटीतर्फे विद्यार्थ्यांना बेंच-डेस्क व कंपास बॉक्सचे वाटप

**नागपूर :** बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर मल्टी पर्पज सोसायटी, नागपूरच्या वतीने सेंट व्हिन्सेंट कॉन्व्हेन्ट, इसासनी येथील विद्यार्थ्यांना १० बेंच-डेस्क व कंपास बॉक्सचे वाटप केले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला माल्यार्पण केले. संस्थेचे अध्यक्ष सतीश ओरके, उपाध्यक्ष अमृतराज पाटील व रामचंद्र गेडाम उपस्थित होते. शाळेच्या मुख्याध्यापिका आंबटकर व किर्ती खोब्रागडे यांच्यासह विद्यार्थी उपस्थित होते. यावेळी रामचंद्र गेडाम व अमृतराज पाटील यांनी संस्थेच्या कार्याची माहिती दिली. शाळेच्या नवीन इमारतीचे बांधकाम सुरू असल्याने भाड्याच्या इमारतीत वर्ग भरत असून, इयत्ता पहिली व दुसरीच्या विद्यार्थ्यांना बेंच-डेस्कअभावी जमिनीवर बसावे लागत होते. मुख्याध्यापिका आंबटकर यांच्या विनंतीनुसार संस्थेने तत्काळ बेंच-डेस्क व कंपास बॉक्स उपलब्ध करून दिल्याबद्दल त्यांनी आभार मानले. अध्यक्ष सतीश ओरके यांनी विद्यार्थ्यांना मन लावून अभ्यास करून मोठे होण्याचे आणि आई-वडील, शाळा व शिक्षकांचे नाव उज्ज्वल करण्याचे आवाहन केले. शिक्षणात कोणतीही अडचण आल्यास संस्थेशी संपर्क साधावा, पदवीपर्यंत मदत करण्याचे आश्वासन दिले.

# धम्मचक्र अनुप्रवर्तन दिनानिमित्त दीक्षाभूमीवर येणाऱ्या अनुयायांसाठी सर्व सुविधा उपलब्ध करून द्याव्या : मागणी



**नागपूर :** धम्मचक्र अनुप्रवर्तन दिनानिमित्त दीक्षाभूमी येथे देश-विदेशातून मोठ्या संख्येने येणाऱ्या अनुयायांना कोणत्याही प्रकारची गैरसोय होऊ नये, तसेच दीक्षाभूमीच्या सर्वांगीण विकास व व्यवस्थापनासाठी प्रशासनाने योग्य नियोजन करावे, या मागणीसाठी भारतीय बौद्ध महासभा, नागपूर महानगर जिल्ह्याच्या वतीने नागपूरचे जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांना निवेदन देण्यात आले. धम्मचक्र अनुप्रवर्तन दिन हा बौद्ध समाजासाठी अत्यंत महत्त्वाचा आणि ऐतिहासिक दिवस आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी १४ ऑक्टोबर १९५६ रोजी दीक्षाभूमीवर धम्मदीक्षा घेतल्यानंतर ही भूमी जगभरातील धम्म अनुयायांसाठी श्रद्धेचे व प्रेरणेचे केंद्र बनली आहे. त्यामुळे या पवित्र स्थळी येणाऱ्या प्रत्येक अनुयायाला सुरक्षित, स्वच्छ, सुसज्ज आणि सन्मानजनक वातावरण मिळणे आवश्यक असल्याचे निवेदनात नमूद केले. यावेळी स्वच्छता, पिण्याचे पाणी, शौचालये, वैद्यकीय सुविधा, रुग्णवाहिका, सुरक्षा व्यवस्था, CCTV, वाहतूक नियंत्रण, पार्किंग, निवास व विश्रांती व्यवस्था, वीज व प्रकाश व्यवस्था, दिशादर्शक फलक, माहिती व मदत केंद्र तसेच आपत्कालीन व्यवस्थापन याबाबत प्रशासनाने विशेष नियोजन करावे, अशी मागणी केली. तसेच केवळ धम्मचक्र अनुप्रवर्तन दिनापुरती तात्पुरती व्यवस्था न करता दीक्षाभूमीच्या दीर्घकालीन आणि सर्वांगीण विकासासाठी कायमस्वरूपी आराखडा तयार करावा, अशीही मागणी करण्यात आली. देश-विदेशातून येणाऱ्या लाखो धम्म अनुयायांच्या श्रद्धेचा आणि भावनेचा आदर राखून दीक्षाभूमीचे व्यवस्थापन जागतिक दर्जाचे असावे, यासाठी प्रशासनाने सर्व संबंधित विभागांचा समन्वय साधून ठोस उपाययोजना कराव्यात, असे सांगण्यात आले. यावेळी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देताना इंजि. पद्माकर गणवीर, भीमराव फुसे, बी. के. हिवराळे, विजय मेश्राम, राज रक्षित,माया पाटील, गंगाधर कांबळे, अरुण भारशंख, सिद्धार्थ सातकर, अरविंद बोरघाटे, आदी उपस्थित होते.



# शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत ए आय बाबत मार्गदर्शन

**चंद्रपूर :** ऋषी अगस्त्य शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था चंद्रपूर येथे राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने आर्टिफिशियल इंटेलिजन्स या महत्त्वाच्या विषयावर मार्गदर्शनपर कार्यक्रमाचे आयोजन संस्थेचे प्राचार्य गजानन राजूरकर यांच्या मार्गदर्शनात आयोजित करण्यात आले होते. महाराष्ट्र ज्ञान महामंडळ यांच्यावतीने मार्केटिंग एक्झिक्युटिव्ह सचिन शंभरकर यांनी आर्टिफिशियल इंटेलिजन्स संदर्भात महत्त्वाची माहिती सांगत विद्यार्थ्यांनी याबाबतचे स्किल शिकून जीवनाला नवी दिशा द्यावी, असे आवाहन केले. राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे मुख्य कार्यक्रम अधिकारी गटनिदेशक राजू श्रीरामे यांनी प्रास्ताविक करताना राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या विविध उपक्रमांवर प्रकाश टाकला. कार्यक्रमास प्रविण श्रीकोंडावार, तसेच संस्थेतील प्रशिक्षणार्थी, निदेशक वर्ग मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

# डॉ. आंबेडकरांना अभिप्रेत बौद्ध अनुयायी घडविण्याचे आवाहन



**नागपूर :** दि बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडिया अर्थात भारतीय बौद्ध महासभा, पूर्व नागपूर अंतर्गत वर्षावासानिमित्त स्वातंत्र्यनगर, नंदनवन येथील दीक्षांत बुद्ध विहारात कार्यक्रमाचे आयोजन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भारतीय बौद्ध महासभेचे नागपूर शहर उपाध्यक्ष हरिदास बेलेकर होते. 'डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अभिप्रेत असलेला बौद्ध अनुयायी' या विषयावर रमा वासनिक यांनी मार्गदर्शन केले. बौद्ध अनुयायांनी पंचशील व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेल्या २२ प्रतिज्ञांचे आचरण करून धम्मनिष्ठ व आदर्श जीवन जगावे, असे आवाहन त्यांनी केले. अध्यक्षीय भाषणात हरिदास बेलेकर यांनी बौद्धांनी देवी-देवतांच्या कर्मकांडापासून दूर राहून बुद्धाच्या पंचशील मार्गावर चालण्याचे आवाहन केले. यावेळी भारतीय बौद्ध महासभेच्या पूर्व नागपूर शाखेच्या हिशोब तपासणीस यांनीही मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाची प्रस्तावना ज्ञानदेव गजभिये यांनी केली. संचालन जासुंद पाटील यांनी, तर आभार प्रदर्शन दीक्षांत बुद्ध विहाराचे अध्यक्ष प्रदीप मोटघरे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी भाग्यशाली ठाकणे व शालू कांबळे यांनी परिश्रम घेतले.

# जाईबाई चौधरी ज्ञानपीठमध्ये 'फूल खिले हैं गुलशन गुलशन' रंगारंग कार्यक्रम



**नागपूर :** जाईबाई चौधरी ज्ञानपीठच्या वतीने स्वातंत्र्य दिनानिमित्त अनुसयाबाई चौधरी कल्चरल हॉल, जे.सी.डी., मंगळवारी बाजार, सदर येथे 'फूल खिले हैं गुलशन गुलशन' आणि 'हमारी स्वतंत्रता की सच्ची राह तिरंगा' या संकल्पनेवर आधारित रंगारंग सांस्कृतिक कार्यक्रम घेण्यात आला. विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीते, पथनाट्य, नृत्य, सामूहिक पी.टी. आणि विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी प्रमुख अतिथींच्या हस्ते ध्वजारोहण व स्वातंत्र्यज्योत प्रज्वलन करण्यात आले. तिरंग्याचे तीन रंग, अशोकचक्र, स्वातंत्र्य व देश या विषयांवर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. मराठी, बंगाली, आसामी, कन्नड, तेलुगू, राजस्थानी व गुजराती पारंपरिक वेशभूषेतील विद्यार्थ्यांनी भारताच्या विविधतेतील एकतेचा संदेश दिला. 'ऐ मेरे वतन के लोगों', 'ऐ वतन दिल की धड़कन हो तुम', 'याद रहे', 'ओ देश मेरे', 'रंग दे बसंती चोला' आणि 'देश रंगीला' आदी गीतांवर विद्यार्थ्यांनी प्रभावी सादरीकरण केले. 'तिरंगा—स्वतंत्रतेची सच्ची राह' या विषयावरील चित्रप्रदर्शनाचेही उद्घाटन झाले .

कार्यक्रमास प्रमुख अतिथी संशोधन लेखिका भिक्खुनी विजया, कायदेतज्ज्ञ भिक्खुनी सुनिता, अकरा विषयात एम.ए. असलेले डॉ. संजय गजभिये, संत शेपणेकर, डायरेक्टर प्रभा चौधरी, डॉ. शिल्पा फजारे (सर्जन, डीएनबी), मुख्याध्यापिका अर्जिया पठाण आणि कार्यक्रमाध्यक्ष संशोधन संस्थेचे डायरेक्टर आचार्य सुधाकर चौधरी उपस्थित होते.

भिक्खुनी सुनिता यांनी स्वातंत्र्य, तिरंगा व मानवतेवर मार्गदर्शन केले. भिक्खुनी विजया यांनी स्वातंत्र्याच्या संकल्पनेवर प्रबोधन केले. डॉ. संजय गजबिये यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सामाजिक,

# बहुजन प्रबोधन मंच, लाखांदूर कडून गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार कार्यक्रम संपन्न



**लाखांदूर :** बहुजन प्रबोधन मंच, लाखांदूर व नागवंश बहुउद्देशीय संस्था, नागपूर यांच्या वतीने बहुजन विद्यार्थी संघाच्या २३ व्या वर्धापन दिनानिमित्त व स्वातंत्र्य दिनाच्या ७९ व्या वर्धापन दिनी १५ ऑगस्ट २०२६ रोजी बोरकर सभागृह, लाखांदूर येथे गुणवंत विद्यार्थ्यांचा जाहीर सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अनिल काणेकर होते. अध्यक्षीय भाषणात अनिल काणेकर यांनी विद्यार्थ्यांनी फुले-शाहू-आंबेडकरांचे विचार आत्मसात करून संविधानातील मूलभूत हक्कांसोबत कर्तव्यांचे पालन करावे, तसेच नैतिकता व तर्कसंगत विचारांना महत्त्व द्यावे, असे आवाहन केले. विनोद ठाकरे, नगराध्यक्ष लाखांदूर, यांनी परिस्थितीवर मात करणारे विद्यार्थीच यशस्वी होतात, असे सांगितले. रज्जू पठाण यांनी विद्यार्थ्यांनी सातत्याने अभ्यास करावा, असे मार्गदर्शन केले. संकेत दहिवले यांनी विषयांच्या मूलभूत संकल्पना समजून घेण्याचे आवाहन केले. उद्धव रंगारी, सेवानिवृत्त प्राचार्य यांनी अभ्यासाची चांगली सवय लावून मिळविलेले यश टिकविण्यासाठी प्रयत्न करण्याचे सांगितले.

रौनक मेश्राम (SSC), दिशा नाकतोडे (SSC), दर्शिका साठवणे (SSC), निधी केशव गाडेकर (HSC विज्ञान), अनुष्का दिघोरे (SSC), अंकित अलोणे (HSC विज्ञान), योगिनी प्रधान (SSC), चेतन गोठे (HSC विज्ञान), प्राजक्ता जांभुळकर (HSC कला), साहिल कापगते (HSC विज्ञान), श्रुतिका बनसोड (HSC वाणिज्य), आचल भोपे (B.A.), अभिषेक सावसाकडे (B.Com.), समीक्षा धोटे (B.Sc.), अभिषेक गजभिये (B.A.) व हर्षद रंभाड (B.Sc.) या विद्यार्थ्यांचा शाळा-महाविद्यालयात प्रथम आल्याबद्दल गुलाबपुष्प, सन्मानपत्र व ग्रंथ देऊन गौरव केला . तुषार कालिदास राहिले याला लाखांदूर टॉपर म्हणून १,००० अनिल काणेकर पारितोषिक देण्यात आले. तसेच छबीला देवेंद्र कोहरे (HSC हार्टिकल्चर) व प्रणय रवींद्र सुखदेवे यांना इंग्रजी विषयात समान गुण मिळाल्याने सिद्धार्थ ज्यु. कॉ. इंग्रजी विषय टॉपर १,००० अनिल काणेकर पारितोषिक विभागून देण्यात आले. त्यांचाही गुलाबपुष्प, सन्मानपत्र, ग्रंथ व स्मृतिचिन्ह देऊन सत्कार केला. यावेळी अभिषेक सावसाकडे व दर्शिका साठवणे यांनी मनोगत व्यक्त केले. संचालन अमर प्रधान, प्रास्ताविक प्रदीप भावे, तर आभारप्रदर्शन शिवकुमार खोब्रागडे यांनी केले.

# बलस्थाने ओळखा आणि समाजसेवेसाठी योगदान द्या : डॉ. प्रशांत निखाडे




**संवाद मित्र जयंत साठे,**

**नागपूर :** श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय, नागपूर येथे आयोजित विद्यार्थी प्रेरण कार्यक्रमाच्या दुसऱ्या दिवसाचा कार्यक्रम प्रेरणादायी वातावरणात झाला. महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी तथा प्रसिद्ध ईएनटी सर्जन डॉ. प्रशांत निखाडे यांनी प्रमुख पाहुणे म्हणून विद्यार्थ्यांशी संवाद साधला. कार्यक्रमाची सुरुवात डॉ. प्रशांत निखाडे यांच्या हस्ते दीप प्रज्वलनाने झाली. त्यानंतर गौरव गीत आणि विद्यापीठ गीत सादर करण्यात आले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ओ. एस. देशमुख यांनी प्रमुख पाहुण्यांचे शाल, स्मृतिचिन्ह व रोप देऊन स्वागत केले. नवनियुक्त विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना डॉ. निखाडे यांनी महाविद्यालयीन जीवनातील आपल्या अनुभवांची आठवण करून देत विद्यार्थ्यांनी आपली बलस्थाने ओळखावीत आणि अभ्यासक्रमाबरोबरच विविध कौशल्यांचा विकास करावा, असे आवाहन केले. तंत्रज्ञानाचा जबाबदारीने वापर करण्याचे महत्त्व त्यांनी अधोरेखित केले. तसेच ज्ञान आणि शहाणपण यातील फरक समजून घेणे, अपयशातून शिकणे, अभ्यासक्रमाच्या पलीकडे वाचन करणे आणि इतरांशी अस्वास्थ्यकर तुलना टाळणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. डॉ. निखाडे यांनी विद्यार्थ्यांच्या शारीरिक व मानसिक आरोग्यावरही विशेष भर दिला. अर्थपूर्ण नातेसंबंध, नियमित व्यायाम, पुरेशी झोप आणि संतुलित जीवनशैली यांचे महत्त्व त्यांनी स्पष्ट केले. व्यसनांपासून दूर राहण्याचा सल्ला देताना त्यांनी कोविड-१९ महामारीच्या काळातील आपल्या अनुभवांचा उल्लेख केला आणि सामाजिक जबाबदारीची जाणीव ठेवून समाजासाठी सकारात्मक योगदान देण्याचे आवाहन विद्यार्थ्यांना केले. प्राचार्य डॉ. ओ. एस. देशमुख यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात महाविद्यालय, संस्थेची शैक्षणिक परंपरा, उपलब्ध शैक्षणिक सुविधा आणि महाविद्यालयाच्या विविध उल्लेखनीय कामगिरीची माहिती विद्यार्थ्यांना दिली. कार्यक्रमास समन्वयक डॉ. एस. व्ही. घोनमोडे यांच्यासह डॉ. व्ही. आर. किन्हीकर, डॉ. जे. के. गुंजाटे, डॉ. एस. के. सय्यद आणि डॉ. पी. एन. देशमुख उपस्थित होते.कार्यक्रमाचे संचालन डॉ. प्रियदर्शिनी देशमुख आणि डॉ. एस. के. सय्यद यांनी केले. डॉ. एस. के. सय्यद यांनी आभार प्रदर्शन केले.

## आजचे कार्यक्रम

**समता सैनिक दल**

**विषय : आर्थिक बजेट मध्ये वाटा या विषयावर प्रबोधन**
**दिनांक : रविवार दिनांक २३ ऑगस्ट २०२६**
**स्थळ : तथागत बुद्ध विहार**
**वेळ : दुपारी ४ ते ६ वाजेपर्यंत**
**आयोजक : डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा त्रिशरण चौक, सुभेदार रामजी आंबेडकर मार्ग रामेश्वरी रोड नागपुर**

**आषाढ वाचन महोत्सव**

**दिनांक 23/8/2026सायंकाळी 6 : 00 डॉ. बाबासाहेब आंबेडकर जन्मशताब्दी चौक काशी नगर. नागपूर.**

## निधन वार्ता

### विठ्ठलराव धोणे



**नागपूर :** वैषाली नगर, लोटस-१ येथील रहिवासी विठ्ठलराव धोणे (वय ७३) यांचे २१ ऑगस्ट २०२६ रोजी अपघाती निधन झाले. त्यांच्या निधनाने परिसरात शोककळा पसरली आहे. त्यांच्या पार्थिवावर शनिवार, २२ ऑगस्ट रोजी वैषाली घाट, नागपूर येथे अंत्यसंस्कार करण्यात आले . त्यांच्या पश्चात कुटुंबीय व आप्तेष्ट असा परिवार आहे.

बहुजन सौरभ प्रकाशक, संपादक, मालक, मुद्रक सिध्दार्थ जीवन कांबळे यांनी देश प्रेस पब्लिकेशन, E-30/2, इंडस्ट्रीयल एरिया, सोनेगाव (सीम), हिंगणा, एआय.डी.सी., नागपूर - 440016 येथे मुद्रित केले व 9/2, स्वराज कॉलनी, मेडिकल कॉलेजच्या मागे, नागपूर-440027, येथे प्रकाशित केले. RNI No. MAHMAR 2020/84035 Printed, Owner by Siddharth Jiwan Kamble, Publisched at 9/2 Swaraj Colony, Behind Medical College, Nagpur 440027, Printed at M/S Desh Publication, E-30/2, Industrial Area, Sonegaon (SEEM), Hingna, MIDC, Nagpur-440016, Editor Siddharth Jiwan Kamble Email: bahujansaurabh@gmail.com Mobile: 9422860648